।। सबका मालिक आत्मा ।।



सर्व आत्मप्रेमी भाविकांना

**आत्मा मालिक गुरूपौर्णिमा महोत्सव**

निमित्त

मनःपूर्वक शुभेच्छा!

आत्मचिंतनाद्वारे
विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक

।। ॐ गुरुदेव ।।

# आत्मा मालिक

जुलै-२०२५

## ॥ सबका मालिक आत्मा ॥



# ॥ अमृतवाणी ॥

या जगात एकच सत्य आहे आणि ते म्हणजे आत्मा. जगातील सर्व वस्तू नष्ट होतील, सृष्टीत असंख्य घडामोडी होतील, पण आत्मा हा चिरकाल टिकेल. कारण त्याला आदिही नाही आणि अंतही नाही. अनादि कालापासून आत्मतत्त्व चालत आलेले आहे आणि अनंतकाळापर्यंत असेच चालत राहील. कारण तो अमर आहे. सर्व देवांच्या उत्पत्तीपूर्वी आत्मा अस्तित्वात होता म्हणून आपण आत्म्याची पूजा केली पाहिजे. आत्म्यावर प्रेम केले पाहिजे. तसेच क्षणभर केलेले आत्मचिंतन कितीतरी श्रेष्ठ आहे. आत्म्याची पुजा केल्यास ती सर्व देवांची पूजा होते.

ईश्वरप्राप्तीचा सर्वात साधा, सोपा आणि सहज मार्ग म्हणजे आत्मचिंतन. कारण ईश्वर आत्म्याच्या स्वरुपात प्रत्येकाच्या, हृदयात बसलेला आहे. नुसतं रुपाला न पाहता 'स्व-रुपाला' पहा आणि ईश्वर प्राप्ती करुन घ्या.

आत्मा हा निर्गुण आणि निराकार आहे. त्याला पाहण्यासाठी कोणत्यातरी सगुण साकार रुपाची आवश्यकता असते. म्हणून कोणत्याही आकारात निराकाराचे ध्यान करावे. सद्‌गुरुचे आत्मरुपात ध्यान करा. आत्म्याला जात, धर्म नसतो. हिंदू, मुस्लिम, शीख, पारसी सर्वांना आत्मचिंतनाने ईश्वरप्राप्ती होते. भगवान श्रीकृष्ण, येशुख्रिस्त, मोहंमद पैगंबर, गुरूनानक, भगवान महावीर, भगवान गौतम बुध्द या सगळ्यांनी आत्म्याची ओळख करुन घेऊन त्याचे चिंतन केले म्हणूनच ते ईश्वररुप झाले.

## ॥ आत्मा मालिक ॥

''आत्मचिंतनाद्वारे विश्वशांतीचा संदेश देणारे मासिक''

# मासिक ॐ गुरुदेव

वर्ष २४ वे अंक ०७ वा जुलै २०२५ ● RNI-MAHMAR/2001/4853

**संस्थापक संपादक**

हृदयनिवासी संत सच्चिदानंद महाराज
हृदयनिवासी संत देवानंद महाराज

**संपादक**

संत परमानंद महाराज
मो. ९५९५९७०२२०, ९९२२०७०२२०

**संपादकीय सल्लागार**

श्री. नंदकुमार सूर्यवंशी
श्री. भगवान दौंड
श्री. हनुमंत भोंगळे

**मार्गदर्शक**

संत निजानंद महाराज
संत विवेकानंद महाराज

**आत्मा मालिक ध्यानपीठ**

दीपक टिळेकर, मो. ८३८००३९३०५
सुखदेव मोरे, मो. ७०५८०५९६६१

**प्रसादालय विभाग (अखंड अन्नदान छत्र)**

श्री. प्रकाश भट, मो. ८६०५४६४५५५
श्री. बाळासाहेब गोर्डे, मो. ७५८८६९४०७४
श्री. प्रकाश गिरमे, मो. ९८५०३३८०५५

**धर्मशाळा (निवास व्यवस्था)**

कुमार पाटील, मो. ९९२२२२८६५५
विलास गायकवाड, मो. ९९२२१७४२११

संपादकीय - गुरू हा संतकुळीचा राजा - संत परमानंद महाराज ४

सद्गुरु-विशेष-विवरण -डॉ. विजय बाणकर ७

सद्गुरूंचा अमृतानुभव - नामदेव सदावर्ते १७

आध्यात्मिक उन्नतीचा सण -बंडोपंत कुलकर्णी २२

विसरू कसा मी.. - डॉ. सुनील शिंदे २५

गुरू साक्षात परब्रह्म -बी. के. गायकवाड २८

गुरुपूर्णिमा : सांस्कृतिक धरोहर - नरेश यादव ३१

या अंकात प्रसिध्द झालेल्या लेखांतील मतांशी संपादक, प.पू. गुरुदेव माऊली, आश्रम संत, पदाधिकारी, मुद्रक आणि प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (वादप्रतिवाद कोपरगांव न्यायकक्षेत.)

ॐ गुरुदेव हे मासिक संपादक, मालक व प्रकाशक संत परमानंद महाराज, विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो. कोकमठाण यांनी मुद्रक संतोष दत्तात्रय माळी, श्री ग्राफिक्स, गांधीनगर रोड, कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे मुद्रीत करुन विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, मु.पो.कोकमठाण, ता. कोपरगांव, जि. अहमदनगर-४२३६०१ येथे प्रकाशित केले.

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## संपादकीय

## गुरू हा संतकुळीचा राजा

**गुरूशिष्यामधील अद्वैतभाव जेव्हा पूर्णत्वास जातो, चंद्र आणि चांदणे एकमेकांत मिसळते, गूळ आणि गोडी एकरूप होतात, सोने आणि त्याचा दागिना अभिन्न रूप पावतात तेव्हा वेगळेपण उरत नाही. म्हणूनच ज्ञानदेवांसारखा परमभाग्य लाभलेला संत गुरूरूप पावतो. त्याचे वेगळेपण उरत नाही. आपणास असा गुरू हवा आहे, जो या जीवनाच्या भवसागरातून तरून नेईल. आत्मपदास पोहचलेला अधिकारी सत्पुरुष जर आपल्या गुरूस्थानी असेल तर मग आपल्या आत्मप्राप्तीचा उद्देश अगदी सहज सफल होईल. अर्थात् त्यासाठी गरज असेल आपल्या संपूर्ण शरणागतीची, अढळ श्रद्धेची आणि निस्सीम भक्तीची.**

**-संत परमानंद महाराज**

**नि**बिड जंगलात हरविल्यानंतर नेमकं कोणत्या दिशेला जावे, हे समजत नाही. मिळेल त्या दिशेने मनुष्य धावत सुटतो. कधी तो रस्ता आणखीच घोर जंगलात जाणारा असू शकतो, तर कधी तो धोकादायक दरीकडेही जाऊ शकतो. पण, जर अशा जंगलात एखादा वाटाड्या, मार्गदर्शक, दिशा दर्शविणारा मिळाला तर? आपण सहीसलामतपणे त्या जंगलातून बाहेर पडू. हेच काम असते गुरूंचे. मानवी जीवन म्हणजे जणू काही निबिड जंगलच. येथे आल्यानंतर आयुष्यात नेमके काय करावे, हे मनुष्याला समजत नाही. त्यामुळे वाट मिळेल तिकडे तो आयुष्यभर धावत असतो आणि शेवटी मनुष्यजन्माचे ईप्सित ध्येय साध्य न होताच तो या जगाचा निरोप घेतो, मानवी देह सोडतो. पण, मानवी जीवनात येऊन सद्गुरूंचा अनुग्रह घेतला, त्यांची कृपा झाली तर या जन्माचा उद्देश काय आणि ते ध्येय गाठण्यासाठीचा मार्ग ते दाखवतात. नव्हे नव्हे, स्वतः शिष्याचे बोट धरून त्या ध्येयाप्रत घेऊन जातात. म्हणूनच जीवनात येऊन गुरू करणे हे प्रत्येकाचे प्रथम कर्तव्य आहे. माता, पिता, शिक्षक, मित्र यांनाही गुरू म्हणता येईल, पण आपणास असा गुरू हवा आहे, जो या जीवनाच्या भवसागरातून तरून नेईल. आत्मपदास पोहचलेला अधिकारी सत्पुरुष जर आपल्या गुरूस्थानी असेल तर मग आपल्या आत्मप्राप्तीचा उद्देश अगदी सहज सफल होईल. अर्थात् त्यासाठी गरज असेल आपल्या संपूर्ण शरणागतीची, अढळ श्रद्धेची आणि निस्सीम भक्तीची.

**श्रीगुरूसारिखा असता पाठिराखा।**
**इतरांचा लेखा कोण करी।**

माऊली ज्ञानेश्वरांपासून ते अगदी आतापर्यंतच्या प्रत्येक संताने सद्गुरूचे महत्त्व वर्णिले आहे. सद्गुरू हेच जीवनाचे तारणहार असून, त्यांच्या कृपेनेच सर्व काही घडते आहे, असा सर्व संतांचा भाव आहे. हा भवसागर तारून नेण्याचे सामर्थ्य केवळ सद्गुरूंमध्येच असते, हे त्रिकालाबाधित सत्य आहे.

**गुरू ब्रह्मा, गुरूर्विष्णू। गुरूर्देवो महेश्वरा।**
**गुरू साक्षात परब्रह्म, तस्मै श्री गुरवे नमः ।।**

सद्गुरूंचे महत्त्व इतके आहे, की त्रिदेवांपेक्षाही श्रेष्ठ आहेत. नव्हे, गुरू हेच ब्रह्मदेव, गुरू हेच

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

विष्णू आणि गुरू हेच महेश्वर अर्थात शंकर आहेत. गुरू साक्षात परब्रह्मच असल्याचे या श्लोकाचा भावार्थ आहे. असे हे सद्गुरू प्रत्येक शिष्याला आपल्या आत्मप्राप्तीचा माग दाखवितात.

मानवी जीवनात येऊन आपण गाडी, बंगला, पैसा, प्रॉपर्टी याच्या मागे लागून संपूर्ण जीवन व्यतीत करतो आणि मग शेवटी जगातून जाताना रित्या हातीच परत जातो. कारण, या जीवनाचे ध्येय आपणास कळलेले नसते. जगात चौऱ्यांशी लक्ष प्रजाती आहेत, त्यातील प्रत्येक जन्मात आपण फिरत राहतो. केवळ मानवजन्म हा एकच जन्म असा आहे, ज्यात आपण ईश्वराची भक्ती करून त्याच्याप्रत पोहचून या जीवनमृत्यूच्या फेऱ्यातून मुक्त होऊ शकतो. मात्र, सद्गुरुसारख्या वाटाड्याशिवाय हे शक्य नाही.

गुरू म्हणजे ज्यापासून आपल्याला सर्वश्रेष्ठ स्वरूपाचे ज्ञान मिळाले, तो होय. एका अर्थाने संपूर्ण जगच गुरू आहे. व्यासोच्छिष्टम् जगत सर्वम. व्यासांच्या लेखणीने सर्व जग उष्टे केलेले आहे, असे म्हणतात. कारण कोणताही विषय त्यांच्या लेखणीने अस्पर्श असा ठेवलेला नाही. कल्पना ही मायेचेच स्वरूप आहे. या मायेतून कसे पैलतीराला जाता येईल, या उद्धवाच्या प्रश्नाला भगवंताने दिलेले उत्तर असे की, ज्ञानसंपन्न होणे हेच मायारूपी नदीतून तरून जाण्याचे प्रमुख साधन आहे. संत एकनाथ महाराज म्हणतात, गुरू हेच जन्मोजन्मीचे मायबाप आहेत. गुरूच्या ठायी ज्याची पूर्ण भक्ती असते, त्याच्या सर्व इच्छा गुरू फळास नेतो. स्वतः देवसुद्धा गुरूची आज्ञा पाळतात. म्हणून देवाचे दुसरे नाव गुरू आहे. एकनाथ महाराजांनी नाथ भागवतात, साधक होऊन भक्तीरूप नौकेत बसून प्रवास करा, भजनरूपी, कीर्तनरुपी भक्ती करा. कारण गुरू हाच या भक्तीनौकेचा सुकाणू फिरविणारा आहे. अशा स्वरूपाची कल्पना मांडलेली आहे.

सद्गुरू शोधणे ही अतिशय जिकिरीची गोष्ट आहे. ज्याचे देवदुर्लभ संचित असेल त्याला तो सहजासहजी पूर्वपुण्याईने प्राप्त होतो. परंतु अनेक जणांना यासाठी अथक परिश्रम करावे लागतात. एकनाथ महाराजांनीही गुरूचा शोध घेतला. ते जेव्हा बाळवयाचे होते, तेव्हा नारायण भट्टांनासुद्धा त्यांच्या प्रश्नाचे उत्तर देता आले नाही. म्हणून श्रेष्ठ गुरूच्या शोधात ते फिरत राहिले. एक दिवस पैठणच्या महादेव मंदिरात ध्यान करीत असताना शंकराच्या पिंडीतून ध्वनी उमटला-

**जनार्दन भेटोनि हर्ष मानी।**
**करितसे वस्ती देवगिरी।।**

नात्यागोत्यांचा मोह दूर सारून लहानगा एकनाथ देवगिरीस गेला. सुखासुखी गुरू त्यांना भेटला नाही. जनार्दन स्वामींच्या भेटीसाठी त्यांना अक्षरशः सत्याग्रहच करावा लागला. मग गडाखाली त्यांची भेट जनार्दन स्वामींशी झाली. स्वामींनी त्यांना कडेवर उचलून घेतले. त्यांच्यावर सद्गुरुची कृपा झाली. सद्गुरूच्या कृपेमुळेच अवर्णनीय, असीम स्वरूपाच्या आनंदाची प्राप्ती होय हे नाथांनी आपल्या आनंद लहरी या काव्यातून सांगितले आहे. गुरूचा उपदेश हा शिष्याचे आयुष्य घडविण्यास महत्त्वाचा आहे. अर्थातच गुरू हा शिष्याची कठोर स्वरूपाची परीक्षा घेत असतो. त्या परीक्षेत शिष्य जर उतरला तरच तो गुरूंच्या अनुग्रहास पात्र ठरतो.

गुरूशिष्याच्या विख्यात जोडीमधील पहिला मान हा निर्विवादपणे निवृत्तीनाथ आणि ज्ञानदेव यांनाच द्यावा लागतो. आपल्या गुरूच्या चरणांची धूळ ही ज्ञानदेवांना कैवल्यप्राप्तीचा आनंद मिळवून

देते. पंधराव्या अध्यायात तर ज्ञानदेवांनी अतिशय भव्यदिव्यपणे श्रीसद्गुरूंची उपासना मांडली आहे.

**आता ऱ्हदय हे आपुले । चौफाळुनिया भले।**
**वरि बैसवू पाऊले। श्रीगुरूची।।**
**ऐक्य भावाची अंजुळी । सर्वेंद्रिय कुड मुळी।**
**भरोनिया पुष्पांजुळी। अध्युदेवो।।**
**इया गुरूचरणसेवा। होपात्र तया देवा।**
**जे सकळांचे मेळावा। पाटू बांधे।।**

गुरूकृपेने असाध्य काही उरत नाही. अशक्य कोटीतील गोष्टी शक्य होतात, ही गोष्ट ज्ञानदेव किती भक्कम आत्मनिश्चयाने कथन करतात.

**तेणे कारणे मी बोलेना । बोले अनुभवाचे रूप दावीन।**
**अतिंद्रिय वरि भोगवित । इंद्रियाकरवी।**

गुरूशिष्यामधील अद्वैतभाव जेव्हा पूर्णत्वास जातो, चंद्र आणि चांदणे एकमेकांत मिसळते, गूळ आणि गोडी एकरूप होतात, सोने आणि त्याचा दागिना अभिन्न रूप पावतात तेव्हा वेगळेपण उरत नाही. म्हणूनच ज्ञानदेवांसारखा परमभाग्य लाभलेला संत गुरूरूप पावतो. त्याचे वेगळेपण उरत नाही. गुरूचा महिमा ज्ञानदेवांनी पुढील शब्दांत वर्णन केलेला आहे-

**गुरू हा सुखाचा सागरू। गुरू हा प्रेमाचा आगरू।**
**गुरू धैर्याचा डोंगरू। कदाकाळी डळमळीना।।**
**कायाकाशी गुरू उपदेशी। तारक मंत्र दिला आम्हासी।**
**बापरखुमादेवी वरासी। ध्यान मानसी लागले।।**

ज्ञानदेवांना आपला गुरू सर्वश्रेष्ठ वाटतो. म्हणूनच ते

**गुरू हा संतकुळीचा राजा।**
**गुरू हा प्राणविसावा माझा।**

असे संबोधतात. याच सर्व पंक्तीत आपले सद्गुरूमाऊली यांचेही वरचे स्थान आहे. आत्मपदाला पोहचलेल्या अशा या वैराग्यमूर्ती सद्गुरूदेवांचा संग लाभणे ही आयुष्यातील सर्वात मोठी शिदोरी आहे. त्यामुळे आपल्या सद्गुरूदेवांचे ऋण व्यक्त करणे हे प्रत्येकाचे आद्यकर्तव्य ठरते. हे ऋण व्यक्त करण्यासाठी, त्यांच्या चरणकमलांवर नतमस्तक होण्यासाठी गुरुपौर्णिमेशिवाय मोठा उत्सव तो कोणता असू शकतो? गुरुपौर्णिमा म्हणजे सर्व गुरुभक्तांसाठी दिवाळीहूनही मोठा सण. ही आध्यात्मिक दिवाळी-अर्थात गुरुपौर्णिमा उत्सव दरवर्षीप्रमाणे यंदाही आत्मा मालिक ध्यानपीठाच्या वतीने भव्य-दिव्य स्वरुपात साजरा करण्यात येणार आहे. मंगळवार ८ ते गुरुवार १० जुलै या काळात सद्गुरूमाऊलींच्या चैतन्यमय उपस्थितीत, देश-विदेशातील संत-महंत, साधकांच्या उपस्थितीत होणाऱ्या या सोहळ्याला आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**||आत्मा मालिक||**

**- संत परमानंद महाराज,**
संपादक

✻✻✻

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## सद्गुरु-विशेष-विवरण

**सद्गुरुंचे स्वरूप जाणून घेणे व ते प्राप्त करून घेणे हे शिष्याचे सर्वोत्तम ध्येय होय. ते 'सद्गुरुनाम ठिकाना है' या समर्पक शब्दांत श्रीकबीर यांनी 'रहना नहीं देस बिराना है' या पदावलीच्या शेवटी उद्घोषिले आहे. सद्गुरु ब्रह्मस्वरूप असतात. ज्यांत कधीही खंड पडत नाही असे ते अखंड ब्रह्मानंद असतात. सद्गुरुस्वरूप व्यक्तीचा आनंद इतर मानवांच्या व ब्रह्मदेवादिकांच्या आनंदापेक्षा अनंतपट असतो.**

**- डॉ. विजय बाणकर**

कोणत्या मार्गाने गेले असता मानवदेहधारी जीव ब्रह्म होतो, ते कृपा करून मला सांगा, अशी विनंती देवी पार्वती भगवान श्रीशंकर यांना करते. तेव्हा श्रीगुरुंकडून दीक्षा घेऊन त्यांची निष्ठापूर्वक निष्काम भक्ती करणे हा त्यासाठीचा एकमेव मार्ग असल्याचा उपदेश ते तिला करतात. तो उपदेश म्हणजे 'गुरुगीता' होय.

'गुरु' या शब्दातील 'गु' आणि 'रु' या दोन अक्षरांचे अर्थ करणारे पुढील दोन श्लोक गुरुगीतेत आहेत -

**गुकारस्त्वन्धकारश्च, रुकारस्तेज उच्यते।**
**अज्ञानग्रासकं ब्रह्म गुरुरेव न संशयः।। क्र.२३।।**
**गुकारः प्रथमो वर्णो, मायादिगुणभासकः।**
**रुकारो द्वितीयो ब्रह्म, मायाभ्रान्तिविनाशनम्।। क्र.२४।।**

आपल्या मूळ स्वरूपाविषयीच्या अज्ञानरूपी अंधारास 'गुकार' व त्या अंधारास ग्रासून टाकणाऱ्या ब्रह्मरूपी तेजास 'रुकार' म्हणतात. अर्थात ते ब्रह्म हेच नि:संशयपणे गुरु होय. गुरु संज्ञेतील 'गुकार' हा प्रथम वर्ण मायादिगुणांचा द्योतक आहे तर 'रुकार' हा द्वितीय वर्ण त्या मायाभ्रांतिचा नाश करणाऱ्या ब्रह्माचा निर्देशक आहे.

आपण ब्रह्मस्वरूप असल्याचे सानुभव ज्ञान झाले की सत्शिष्याला त्याचे गुरुही ब्रह्मस्वरूप असल्याचे ज्ञान होत असते. अशा ब्रह्मज्ञानी सत्शिष्याच्या भूमिकेतून सकळ सिद्धांना गुरुस्थानीं असलेले श्रीशंकर यांनी सद्गुरुंना नमन केले आहे. गुरुगीतेतील ज्या श्लोकांत त्यांनी सद्गुरुंचे चौदा विशेष उल्लेखिले आहेत तो श्लोक असा आहे -

**ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमूर्तिम्**
**द्वंद्वातीतं गगनसदृशं तत्त्वमस्यादिलक्ष्यम् ।**
**एकं नित्यं विमलमचलं सर्वधीसाक्षिभूतं**
**भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि।। क्र.८९।।**

ब्रह्मानंदादि हे विशेष म्हणजे सद्गुरु या शब्दरूपी मूर्तिचे सौंदर्य अधिकाधिक खुलवत जाणारे जणू अर्थरूपी अप्रतिम अलंकारच होत. या चौदा विशेषांचे क्रमशः विवरण करीत श्रीसद्गुरुंचे मूळ 'स्व'रूप समजून घेण्याचा प्रयत्न करूयात.

**१. ब्रह्मानंदं :**

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

सद्गुरुंचे स्वरूप जाणून घेणे व ते प्राप्त करून घेणे हे शिष्याचे सर्वोत्तम ध्येय होय. ते 'सद्गुरुनाम ठिकाना है' या समर्पक शब्दांत श्रीकबीर यांनी 'रहना नहीं देस बिराना है' या पदावलीच्या शेवटी उद्घोषिले आहे. सद्गुरु ब्रह्मस्वरूप असतात. ज्यांत कधीही खंड पडत नाही असे ते अखंड ब्रह्मानंद असतात. सद्गुरुस्वरूप व्यक्तीचा आनंद इतर मानवांच्या व ब्रह्मदेवादिकांच्या आनंदापेक्षा अनंतपट असतो. शरीर, मन व बुद्धी यांना सुख देणाऱ्या उपभोगसाधनांनी संपन्न असलेल्या चक्रवर्ती राजाचा जो आनंद तो एक मानुषानंद होय. असे जे शंभर मानुषानंद तो एक मनुष्यगंधर्वाचा आनंद होय. अर्थात, मानुषानंदाहून मनुष्यगंधर्वाचा आनंद शंभरपट असतो. मनुष्यगंधर्वाच्या आनंदापेक्षा देवगंधर्वाचा आनंद शंभरपट असतो. देवगंधर्वाच्या आनंदापेक्षा (आर्यमादिक) पितरांचा आनंद शंभरपट असतो. पितरांच्या आनंदापेक्षा आजानदेवांचा आनंद शंभरपट असतो. आजानदेवांच्या आनंदापेक्षा कर्मदेवांचा आनंद शंभरपट असतो. कर्मदेवांच्या आनंदापेक्षा तेहतीस देवांचा आनंद शंभरपट असतो. तेहतीस देवांच्या आनंदापेक्षा त्यांना आज्ञेत ठेवणाऱ्या इंद्राचा आनंद शंभरपट असतो. इंद्राच्या आनंदापेक्षा त्याचा आचार्य असलेल्या बृहस्पतीचा आनंद शंभरपट असतो. बृहस्पतीच्या आनंदापेक्षा ब्रह्मदेवाचा आनंद शंभरपट असतो.[१] अशाप्रकारे या दहा आनंदातील नंतरचा आनंद त्याच्याआधीच्या आनंदापेक्षा अधिक म्हणजे अतिशय असतो. म्हणून हे दहा आनंद 'सातिशय' असल्याचे म्हटले आहे. याउलट, ब्रह्मनिष्ठ व श्रोत्रिय व्यक्तीचा म्हणजे सद्गुरुंचा आनंद 'निरतिशय' असतो. त्याहून दुसरा कोणताही आनंद अधिक नसतो. त्यास ब्रह्मानंद म्हणतात. ब्रह्मानंदाच्या सूक्ष्म कणांत उपरोक्त दहाही आनंद अंतर्भुत असतात म्हणून ब्रह्मानंद हा अद्वितीय व सर्वोत्कृष्ट आनंद होय.[२]

मानवदेहधारी जीवांना ब्रह्मानंद कधी प्राप्त होतो त्याबाबत संत श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात,

**'ते हे विषयवैराग्य। जे आत्मलाभाचे भाग्य।**
**येणें ब्रह्मानंदा योग्य। जीव होती।।'**[३]

अर्थात, आत्मप्राप्तीचे भाग्य असलेले ऐहिक व पारलौकिक सुखाबाबतचे वैराग्य म्हणजे त्यागबुद्धी निर्माण होते तेव्हा जीव 'ब्रह्मानंदायोग्य' होत असतात. श्रीविद्यारण्य-भारतीतीर्थ म्हणतात की, ज्यावेळी द्वैत भासत नसते व निद्राहि नसते त्यावेळी व्यक्ती ब्रह्मानंदीं असते[४] आणि श्रीहंसराजस्वामी म्हणतात की, श्रोत्रिय व ब्रह्मनिष्ठ असलेली व्यक्ती म्हणजे सद्गुरु हे 'ऐता' म्हणजे 'स्वयंसिद्ध ब्रह्मानंद' असतात.[५]

'आनंदाचे डोहीं आनंदतरंग। आनंदचि अंग आनंदाचे।।', आणि 'आम्ही आनंदेंचि धालो। आनंदचि ल्यालो अलंकार।।' या दोन अभंगचरणांत संत श्रीतुकाराम यांनी ब्रह्मांनदाचे असाधारण स्वरूप व्यक्त केले आहे; स्वतः ब्रह्मानंदस्वरूप होते म्हणून 'अवघाचि संसार सुखाचा करीन। आनंदें भरीन तिन्ही लोक।।, अशा शब्दात संत श्रीज्ञानदेव यांनी ब्रह्मानंदी व्यक्तीचे अलौकिक सामर्थ्य व्यक्त केले आहे आणि 'येथोनि आनंदु रे' या अभंगात संत श्रीएकनाथ हे 'ब्रह्मानंद टाळी' वाजण्याच्या ठिकाणाशिवाय ब्रह्मानंदानुभवातील आणखी एक गूढगम्य खुणही सांगून गेले आहेत.

**२. परमसुखदं :**

ज्या सुखापलीकडे कोणतेही सुख नसते ते परमसुख होय. 'यत् सुखात् न अपरम् सुखम् तत् ब्रह्म इति अवधारयेत्' म्हणजे ज्याच्या (प्राप्तीच्या) सुखापेक्षा दुसरे कोणते सुख असत नाही, तेच ब्रह्म असते.[६]

'ते तू आहेस' असा सदुपदेश सद्गुरुंनी केल्यानंतर 'मी ब्रह्म आहे', असा अनुभव सत्शिष्यास येतो म्हणजे त्यास ब्रह्मप्राप्तीरूप परमसुखाचा लाभ होतो व सद्गुरु त्या परमसुखाचे दाते असल्याचे स्पष्ट होते.

जीवाला आत्मलाभ होतो तेव्हा तेथे जी स्थिति प्राप्त होते त्या स्थितिला सुख म्हणतात, असे श्रीज्ञानेश्वर

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

म्हणतात.[७] अर्थात, जीव व आत्मा यांचे मीलन होते तेव्हा येतो तो अनुभव म्हणजे परमसुख होय. जीव व आत्मा यांचा अखंड योग घडवून आणण्यासाठीच्या साधनेबाबत मार्गदर्शन करतात म्हणूनही श्रीसद्गुरू परमसुखद असल्याचे म्हटले आहे.

**३. केवलं :**

ब्रह्म या संज्ञेचा मराठीत 'सर्वप्रकारे सर्वत्र वाढलेले' असा व्युत्पत्तिशास्त्रीय अर्थ दिला गेला आहे. 'अयम् आत्मा ब्रह्म' या वेदवाक्यानुसार आत्मा व ब्रह्म हे स्वरूपतः एक आहेत. म्हणून 'केवल' या विशेषाचा अर्थ आत्म्याबाबतच्या विवरणात स्पष्ट होतो.

आत्म्यामधून विश्व व विश्वात असलेले सर्व छोटेमोठे प्राणीपदार्थ निर्माण होत असतात. विश्वातील सर्व काही मुळात 'केवळ आत्मा'च आहे. विश्व हा केवळ आत्म्याचा विस्तार आहे. हे अंतिम सत्य, 'माझेया विस्तारलेपणा नांवें। हे जगचि नोहे आघवे।' व 'मज एकाचा विस्तारु। ते हे जग।।', अशा शब्दात जगद्गुरु श्रीकृष्ण यांनी व्यक्त केले आहे.[८]

श्रीसद्गुरुकृपा म्हणून दिव्यज्ञानदृष्टी लाभलेल्या सत्शिष्याला आपला आत्मा सर्वव्यापक असल्याचा अनुभव येतो तेव्हा तोही 'केवलोऽहं!' असे उद्गारत आपली धन्यता व्यक्त करतो. स्वात्म्याच्या 'केवल'त्वाचा (कैवल्याचा) हा अनुभवयुक्त अर्थ 'मीच आत्मा ब्रह्म एकला। दुसरा कोणी नाही जन्मला। ऐसा मीच होऊन मातें पाहू लागला। सर्वांही भूतीं।।', या ओवीत श्रीहंसराजस्वामींनी व्यक्त केला आहे.[९] सारांश, सर्वव्यापी आत्मस्वरूप वा ब्रह्मस्वरूप अभंग सत्तत्त्व हे सद्गुरुंचे केवलत्व होय.

**४. ज्ञानमूर्तिम् :**

ज्ञानमूर्ति म्हणजे ज्ञानाचे मूर्तिमंत स्वरूप वा सर्वज्ञानी व्यक्ती होय. 'तू माझ्या हृदयात असलेला ज्ञानमूर्ति आहेस; वेद, षड्दर्शने, इतिहास, पुराणे यांचा गुह्यतम अर्थ सांगणारा तुझ्यासारखा ज्ञानी वक्ता तिन्ही लोकांत नाही', असे जगद्गुरु श्रीकृष्ण यांना सत्शिष्य श्रीउद्धव म्हणतो आणि 'मी तत्त्वतः ज्ञानस्वरूप' आहे, असे तेही म्हणतात.[१०]

परब्रह्मस्वरूप पण मनुष्यरूपात असलेले आपले सद्गुरुदेखील ज्ञानमूर्ति असल्याचे जाणतो आणि त्यांची अविरत सेवा करीत राहतो तो सत्शिष्यही 'मनुष्याकारें ज्ञानचि' म्हणजे ज्ञानमूर्ति असतो, हे सत्य जाणून घे व तसा ज्ञानमूर्ति हो, असेही त्यांनी संत श्रीज्ञानेश्वर महाराज यांच्या मुखातून अप्रत्यक्षपणे उपदेशिले आहे.[११]

'अध्यात्मविद्या म्हणजे ब्रह्मविद्या ही माझी विभूति आहे', असेही त्यांनी गीतेत म्हटले आहे. सद्गुरू ब्रह्मविद्यासंपन्न म्हणजे मूर्तिमंत ब्रह्मज्ञान असतात. त्यांनाही जगद्गुरु श्रीकृष्ण यांच्याप्रमाणे चौदा विद्या व चौसष्ट कला आत्मसात (झालेल्या) असतात. संत श्रीएकनाथ यांनी 'हस्तामलक'नामक प्रकरण-ग्रंथात गौरविले आहे त्या जन्मतःच ब्रह्मज्ञानी असलेल्या सुपुत्राच्याप्रमाणे सिद्धप्रज्ञ व्यक्तीचे मनच सर्व विद्यांना प्रसवत असते म्हणजे तिच्या मुखातून सर्व शास्त्रे स्वयमेव प्रगट होत असतात.[१२] थोडक्यात, परमेश्वर व हस्तामलक यांच्याप्रमाणे सद्गुरुदेखील सर्वज्ञानसंपन्न म्हणजे ज्ञानमूर्ति असतात.

**५. द्वंद्वातीतं :**

एकमेकांविरुद्ध गुणधर्म असलेल्या दोन गोष्टींच्या जोडीला द्वंद्व म्हणतात. उदा. सुख-दु;ख, शीत-उष्ण, पाप-पुण्य, स्वर्ग-नरक, शुभ-अशुभ, लाभ-अलाभ, शत्रू-मित्र, निंदा-स्तुति, मान-अपमान इत्यादि. सद्गुरु या सर्व द्वंद्वांच्या अतीत म्हणजे पलीकडे असलेल्या 'स्व'रूपीं रहात असतात.[१३] ते परब्रह्मस्वरूप असतात. आपल्या परब्रह्मस्वरूपापासूनच सर्व जीव तसेच पृथ्व्यादि पंचमहाभूते व तज्जन्य सर्व पदार्थ

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

निर्माण झालेले आहेत, हे ते जाणत असतात. म्हणून त्यांच्या लेखी, विश्वातील कोणत्याही प्राण्यांच्यामध्ये व पदार्थांमध्ये द्वैत वा द्वंद्व नसते. भगवान श्रीकृष्ण स्वत:बाबत म्हणतात तसे तेही 'सकळ द्वंद्वांमाजीं निर्द्वंद्व' असतात.[९४]

द्वंद्वातीत असणे हा सद्गुरुंचा विशेष उल्लेखून त्यांच्याप्रमाणे द्वंद्वातीत होणे हे परमोच्च साध्य असल्याचे सकळ सिद्धांचा गुरू असलेले श्रीआदिनाथ यांनी अप्रत्यक्षपणे उपदेशिले आहे; आणि, व्यक्ती द्वंद्वातीत कशी राहू शकते ते श्रीकबीर यांनी एका दोह्यातून सूचित केले आहे. त्या दोह्याचा भावानुवाद असा आहे - 'मतिमंद तो मासा स्वत:ला वाचवूं न शकला। गेला असतां तळांत तों रे नसतां आडकला।।' सागराच्या पृष्ठभागाजवळ असतात ते मासे कोळ्याने टाकलेल्या जाळ्यात अडकतात व तळात असतो वा जातो तो मासा त्या जाळ्यापासून लांब असतो वा राहतो. प्रपंच वा संसाररूपी सागराच्या पृष्ठभागी असणे म्हणजे देहबुद्धीयुक्त असणे होय. देहबुद्धीमुळेच जीव सुखदु:खरूपी जाळ्यात अडकून पडतात. परब्रह्म हे त्या सागराचा पैलतीर वा तळ होय. या पैलतीराला वा तळात असतात ते सुखदु:खरूप जाळ्याच्या म्हणजे द्वंद्वाच्या अतीत असतात. निजधामाला जाण्यासाठी म्हणून जगद्गुरु श्रीकृष्ण विशिष्ट आसनात बसलेले असतात. तेथे मृग आहे असे वाटून त्याची शिकार करण्यासाठी व्याध बाण सोडतो. तो बाण श्रीकृष्णांच्या टाचेत 'खडतरला' म्हणजे घुसून राहिला त्यावेळी ते किंचितही 'दचकले' नव्हते, अशा अगदी साध्या शब्दांत संत श्रीएकनाथांनी जगद्गुरुंचे देहातीत म्हणजे दु:खातीत वा द्वंद्वातीत असण्याचे लक्षण समजावून सांगितले आहे.[९५]

थोड्या वेळाने राज्याभिषेक होणार होता म्हणून राजवस्त्रे परिधान करून प्रभू श्रीरामचंद्र तयार होते. पण सावत्र मातेच्या इच्छेनुसार राज्याभिषेकासाठी घातलेली राजवस्त्रे उतरवून ते बाजूला ठेवतात व चौदा वर्षे वनवासाला जाण्यासाठीची तयारी म्हणून वल्कले नेसतात. सर्वप्रिय असलेल्या त्यांच्यासारख्या राजपुत्रावर ओढवलेल्या या अनपेक्षित प्रसंगामुळे सर्वांना प्रचंड दु:ख होत होते. श्रीरामांच्यावर मात्र त्या प्राप्त परिस्थितीचा व वनांमधील वास्तव्यात सहन कराव्या लागणार असलेल्या भावी दु:खदायी परिस्थितींचा यत्किंचितही परिणाम होत नाही. मनाला सुखदु:खाचा किंचितही स्पर्श न झालेले ते मातादि सर्वांचे सांत्वन करतात व वनवासाला जातात. त्यावेळचे प्रभु श्रीरामकृत आचरण हे 'सुखीं संतोषां न यावे। दु:खीं विषादां न भजावे। आणि लाभालाभ न धरावे। मनामाजी।।'[९६] या ओवीत संत श्रीज्ञानेश्वरांना अपेक्षित आहे त्याप्रमाणे सुखदु:खरूपी द्वंद्वाच्या अतीत म्हणजे स्थितप्रज्ञ असण्याचे एक सर्वोत्तम उदाहरण होय.

मिथ्या प्रपंचाच्या ठिकाणी शुभाशुभाची कल्पना ही लटकी असते; याउलट, नित्यसत्य सद्वस्तूच्या ठिकाणी अणुमात्र शुभाशुभ नसते.[९७] सदैव सत् असलेली वस्तू म्हणजे सद्वस्तू होय. सद्वस्तू हेच सद्गुरुंचे मूळ स्वरूप होय.[९८] ते नीट समजून घेता यावे म्हणूनच द्वंद्वातीत या त्यांच्या विशेषाचे सकलार्थ सूचित करणारे सुखदु:खेंविण निर्द्वंद्व, द्वंद्वातीत द्वंद्वसाम्य, अद्वंद्वस्थिती, द्वंद्वबंधन न बाधणे, द्वंद्व प्रकाशोनि निर्द्वंद्व व द्वंद्वनिर्मुक्त असणे, असे काही शब्दही श्रीएकनाथ व श्रीज्ञानेश्वर यांनी अनुक्रमे भागवत व ज्ञानेश्वरी या ग्रंथांमध्ये लिहून ठेवले आहेत.

**६. गगनसदृशं :**

भगवान श्रीशंकर यांनी उल्लेखिलेल्या सद्गुरुंच्या चौदा विशेषांपैकी गगनसदृशं हा विशेष विशेषच आहे. म्हणूनच जणू श्रीगुरु दत्तात्रेयमहाराज यांनी आपल्या 'अवधूत गीता' या ग्रंथाच्या तिसऱ्या अध्यायातील शेहेचाळीस श्लोकांपैकीच्या चाळीस श्लोकांचा शेवट 'गगनोपमोऽहं' या शब्दाने केला आहे. इतर अनेक श्लोकांतही गगनसदृशं या विशेषाचा पुनरुच्चार करणारे समानार्थी शब्द आहेत.

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

सद्गुरु साक्षात् परब्रह्म असतात. परब्रह्म सर्वव्यापक असते. आकाशाप्रमाणे परब्रह्माचाही अंत लागत नाही. तथापि, परब्रह्म आकाशाहून महान असते. परब्रह्म हे सर्वांहून विशाल, अलिप्त व निर्मळ कसे आहे ते समजावे म्हणून आकाशाचा दृष्टान्त दिला जातो खरा; परंतु, तोही परब्रह्माला काहीसाच लागू पडणारा ठरतो. कारण, परब्रह्माच्या केवळ एका भागात (अंशांत) सर्व ब्रह्मांडे मावली आहेत व जणू समुद्ररूपी परब्रह्मात आकाश हे राईएवढे आहे. आकाश अवकाशरूप असल्याचे भासते म्हणजे त्यात पोकळी भासते; याउलट परब्रह्म हे सर्वत्र घनदाट भरलेले व निराभास असते.[१९] शिवाय, विविध इमारती, पर्वत व समुद्रादि छोट्या-मोठ्या पदार्थांच्यामध्ये काही दिसत नाही म्हणून आकाश पोकळ (अवकाशयुक्त) आहे, असे म्हटले जाते. पण खरे तर, तेही त्या सर्व पदार्थांना अंतर्बाह्य व्यापून असते. हे सत्य घटाकाश, मठाकाश व महदाकाश यांचे एकत्व दर्शवून समजाविले जात असते. तथापि महदाकाशही 'जड वा अचेतन' असते व त्याहून अतिशय सूक्ष्म, चैतन्ययुक्त व विशाल असलेल्या 'चिदाकाशाचा' ते एक छोटासा भाग असते.

चिदाकाश म्हणजेच परब्रह्म वा सद्गुरु होय.[२०] चिदाकाश हेच राघवाचे मूळ स्वरूप होय. सद्गुरु श्रीरामचंद्र यांच्या त्या विशेष वा मूळ स्वरूपाचा स्वानुभव 'दुजेवीण जो तोचि तो हा स्वभावें। तया (आकाशासम) व्यापकू व्यर्थ कैसे म्हणावे।।' व 'रघुनायका ऊपमा ते न साहे' अशा अगदी समर्पक भाषेत समर्थ श्रीरामदासस्वामीही व्यक्त करून गेले आहेत.[२१]

थोडक्यात, श्रीविठ्ठलाच्याप्रमाणे सद्गुरुंचे परब्रह्मस्वरूप 'आकाश व्यापून उरले आहे', 'गगनाहूनि वाड' व 'व्योमाकार दिसते परंतु त्याहूनही परते' म्हणजे वेगळे आहे,[२२] हे सत्य 'गगनसदृशं' या विशेषाद्वारे तदनुभवी महात्म्यांनी सूचित केले आहे.

**७. तत्त्वमस्यादिलक्ष्यम् :**

तत्त्वमसि, अहं ब्रह्मास्मि, अयमात्मा ब्रह्म व प्रज्ञानं ब्रह्म, ही चार महावाक्ये अनुक्रमे सामवेद, यजुर्वेद, अथर्ववेद व ऋग्वेद या चार वेदांमध्ये आहेत.

'तत्त्वमस्यादिवाक्येन स्वात्माहि प्रतिपादितः' म्हणजे तत्त्वमस्यादि महावाक्यांच्या योगाने आपला आत्माच प्रतिपाद्य आहे, असे श्रीगुरु दत्तात्रेयमहाराज म्हणतात.[२३] या वाक्यांच्या मार्गदर्शनाबाबत प्रभू श्रीरामचंद्र म्हणतात की, सद्गुरुंनी प्रथम 'तत्त्वमसि' या वाक्याचा उपदेश करावयाचा असतो. तत् म्हणजे ते आणि त्वं म्हणजे तू होय. ते ब्रह्म जीवरूपी तू आहेस, हे सत्य शिष्यास समजेल अशाप्रकारे सांगावयाचे असते. नंतर शिष्याने 'अहं ब्रह्मास्मि' म्हणजे 'मी ब्रह्म आहे' या वाक्याच्या अर्थाचे मननपूर्वक योगसाधन करावयाचे असते. परिणामी त्यास 'अयम् आत्मा ब्रह्म' म्हणजे आपला आत्मा ब्रह्म असल्याचा अनुभव येतो व त्यानंतर परिपूर्ण श्रीसद्गुरुकृपा म्हणून 'प्रज्ञानं ब्रह्म' या वाक्याच्या अर्थाचा म्हणजे आपण सर्वव्यापक परब्रह्मज्ञानस्वरूप असल्याचा अनुभव येतो.[२४] अशाप्रकारे, आत्मारूपी आपणच शुद्ध तत्पदार्थ, परमार्थ वा महावाक्यांचा शुद्ध लक्ष्यांश म्हणजे सद्गुरुस्वरूप असल्याची निश्चिती होते व देहबंधन तुटून जीवास मुक्ती मिळते.[२५] तत्त्वमस्यादिवाक्यांचे परम लक्ष्य असलेल्या त्या सद्गुरु-स्वरूपाशी मी एकरूप होऊन गेलो आहे म्हणून द्वैताचे भान हारपले आहे, असे 'त्वंपदीं सिद्ध निवृत्ती लाधले। गुरुलक्ष्यीं हारपले द्वैतभान।।' या अभंगातून संत श्रीज्ञानदेव यांनी उद्घोषिले आहे.[२६]

थोडक्यात, 'त्वंपद आणि तत्पद। असिपदाचा जाणता शुद्ध। जो सर्वसाक्षी आनंदकंद। तोचि प्रतिपाद्य सद्गुरुरावो।।' होय.[२७]

**८. एकं :**

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

स्वर्ग, मृत्यू व पाताळ हे तिन्ही लोक जेथून निर्माण झाले वा ज्याने निर्माण केले तोच एक देव आहे.[२८] तोच देवांचाही देव म्हणजे परमेश्वर होय. परमेश्वर-प्राप्तीचा प्रकार समजून देण्या-घेण्या-साठी त्याने गुरुशिष्यपरंपरा सुरू केली आहे.[२९] या परंपरेतील आद्य गुरु म्हणून त्याने हंसरूप धारण केले, ब्रह्मदेवाला ज्ञान दिले आणि त्यांनतर आजपर्यंत ती परंपरा अखंडित ठेवली आहे. परमेश्वररूपी नित्य सत्य वस्तूचे दर्शन घडवितात ते सद्‌गुरु असतात. मनुष्यरूपात ते अनेक दिसत असले तरी, श्रीरामदासस्वामी म्हणतात त्याप्रमाणे, ते स्वरूपीं मिळालेले म्हणजे स्वरूपतः एकच असतात.[३०] देवाधिदेवाशी एकरूप असलेले सर्व सद्‌गुरु देवाप्रमाणे 'एक' असतात. म्हणूनच एक हा त्यांचा स्वरूप-विशेष उल्लेखीत श्रीगुरु श्रीशंकर यांनी सद्‌गुरुंना नमन केले आहे.

सृष्टी निर्माण होण्यापूर्वी एक देवच होता. 'एकोऽहं बहु स्याम्' म्हणजे मी एक आहे, ते अनेक व्हायचेय, असा संकल्प त्याच्याठिकाणी निर्माण झाला व तो सृष्टीतील सर्व छोटेमोठे प्राणीपदार्थ झाला. कोणत्याही उपकरणसामग्रीवाचून व केवळ स्वरूपापासून त्याने जग निर्माण केले आहे.[३१] सदैव एक असलेला तो अनेक होऊन विश्वात वावरत असल्याचा अनुभव सद्‌गुरु व संत अखंडपणे घेत असतात. तो अनुभव 'एकपणें तूंचि आतां। एकीं दाविसी अनेकता। परी एकात्मता न मोडे।।' या त्यालाच उद्देशून लिहिलेल्या भागवतारंभीच्या ओवीद्वारे व्यक्त करीत देवाशी एकरूप असलेल्या सद्‌गुरुंच्या 'एक' या विशेषाचा अर्थ संत श्रीएकनाथ यांनी अप्रत्यक्षपणे स्पष्ट केला आहे.

थोडक्यात, सृष्टी निर्माण होण्यापूर्वी, सृष्टीकार्य चालू असताना व सृष्टीचा लय झाल्यानंतरही मुळात सद्वस्तु असलेले सद्गुरुच होते, आहेत व असतील, हे अजातवादरूपी त्रिकालाबाधित सत्य त्यांना 'एक' हे विशेषण देऊन उद्घोषिले आहे.

**९. नित्यं :**

श्रीसद्गुरु हे साक्षात परब्रह्म असतात. परब्रह्म अविनाशी वा शाश्वत असते. म्हणजे ते नसते असे कधीही नसते. या अर्थाने नित्य असणे हा परब्रह्मस्वरूप सद्‌गुरुंचा एक अनन्यसाधारण विशेष होय.

जीव हा मज परब्रह्माचा एक अंश आहे, असे जगद्‌गुरु श्रीकृष्ण म्हणतात.[३२] अर्थात परब्रह्माप्रमाणे जीवही नित्य असतो. तो अग्नीने जळत नसतो, वाऱ्याने सुकत नसतो, शस्त्राने कापला जात नसतो व पाण्याने भिजला जात नसतो.[३३] व्यक्ती बाल्य, तारुण्य व वार्धक्य या तिन्ही अवस्थेत असताना व मेल्यानंतरही जीव आहे तसाच कायम राहतो. त्याचे मूळ स्वरूप बदलत नसते. अशाप्रकारे, देह नाशिवंत म्हणजे अनित्य तर देहधारी जीवात्मा अविनाशी म्हणजे नित्य असल्याचे त्यांनी अर्जुनास समजावून सांगितले आहे.

जीवाला जेव्हा 'मी संकुचित देह नसून मी सर्वव्यापी आत्मा वा परब्रह्म' असल्याचे म्हणजे आपल्या मूळ आत्मस्वरूपाचे सानुभव ज्ञान होते तेव्हा आणि तेव्हाच त्यास नित्य असणे म्हणजे काय ते स्पष्ट होत असते आणि जे नित्यत्वाने उरते ते आपले व सद्‌गुरुंचे स्वरूप सदोदित होत असते.[३४]

**१०. विमलं :**

दुःखी असलेल्या अलर्क राजाला 'तू कोण ते आता शोधून सांग बरे' असे श्रीगुरु दत्तात्रेयमहाराज म्हणतात. तेव्हा, 'आकाश वायु तेज जळ। पृथ्वी हीं भूतें जड केवळ। यांहूनि मी विमळ। असें निश्चळ सच्चिदात्मा।। ज्ञानकर्मेंद्रिय प्राण। चतुर्विध अंतःकरण। हे भौतिक विकार जाण। यांहूनि भिन्न निर्गुण मी।।', असे तो म्हणतो.[३५] अर्थात श्रीगुरुंच्या दर्शनयुक्त कृपाप्रसादाचा परिणाम म्हणून सर्व दुःखांपासून मुक्त झालेला राजा, मी जड पंचमहाभूतांपासून बनलेला स्थूल देह, त्यातील मन, बुद्धी, चित्त व अहंकारयुक्त

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

अंत:करण तसेच डोळेकानादि ज्ञानेंद्रिये या सर्वांहून वेगळा असलेला पूर्णत: मलरहित, शुद्ध वा शुचिर्भूत असा निर्गुण सच्चिदात्मा आहे, असे म्हणतो. राजाच्या या उत्तरात विमल हा सद्‌गुरु-विशेष स्पष्ट होतो. शरीर, अंत:करण, त्रिगुण हे सारे विकार व त्याबद्दलचा अभिमान असणे म्हणजे मलिन वा अशुद्ध असणे होय. याउलट, मायाजनित शरीरादि नाशिवंत गोष्टींबद्दलच्या ममत्वयुक्त जाणीवेचा लवलेशही नसणे म्हणजे पूर्णत: शुद्ध वा विमल असणे होय. अशाप्रकारे जीव पूर्णत: विमल झाला की तो परब्रह्मस्वरूप सद्‌गुरुसम होत असतो.

सृष्टी निर्माण होण्यापूर्वी, सृष्टी-कार्य चालू असताना व सृष्टीचा लय झाल्यानंतरही जे आहे तसेच कायम राहते ते परब्रह्मच निर्मळ म्हणजे विमल असल्याचे बोलले जाते, असे 'माया अविद्येने नाही मळले। अहंकृतीने न जाय विटाळले। याचि हेतू निर्मळ बोलिले। तिन्ही काळीं ब्रह्म।।', या ओवीत श्रीहंसराजस्वामी यांनी विशद केले आहे.[३६] अर्थात, परब्रह्मस्वरूप सद्‌गुरु निर्मळ वा विमल असतात, असे म्हणण्याचे कारणच जणू (अलर्क राजाप्रमाणे) त्यांनीही अप्रत्यक्षपणे सांगितले आहे.

**११. अचलं :**

देवाधिदेव अनंत विश्वाचा 'अन्मूव्हड् मूव्हर' म्हणजे 'अचल चालक' असल्याचे तत्त्वज्ञांनी प्रतिपादिले आहे. देवाधिदेव स्वत: अचल म्हणजे सदैव स्थिर असून विश्वातील सर्व छोट्या-मोठ्या प्राण्यांना व पदार्थांना गती देत त्यांच्यात बदल घडवून आणीत असतो. देवाधिदेव परब्रह्मस्वरूप आहे व सद्‌गुरु साक्षात परब्रह्म असतात. म्हणून सद्‌गुरुही अचल असतात, असे श्रीएकनाथांनीही म्हटले आहे.३७ परब्रह्मस्वरूप सद्‌गुरु अचल कसे तेही त्यांनी समजावून सांगितले आहे. ते असे : घट असताना व तो फुटून त्याचे तुकडे तुकडे झाल्यानंतरही आकाश जसे जसेच्या तसे कायम राहते तसे जगाच्या उत्पत्ती-स्थिती-अंतींही परब्रह्म अच्युत म्हणजे अचल वा सदैव स्थिर रहात असते.[३८]

आत्मा सर्वत्र असतो. जो/जे सर्वत्र असतो/असते त्यास येणे-जाणे नसते. तथापि आकाशाप्रमाणे आत्मा सर्वत्र असतो. त्यामध्ये जे देह तयार होत असतात त्या देहांना जन्म-मरण असल्यामुळे आत्माही जन्मतो-मरतो वा एका देहातून दुसऱ्या देहांत जातो-येतो, असे म्हटले जाते. अर्थात आकाशात चंद्र स्थिर असताना हालणाऱ्या ढगांमुळे तो जसा धावत नसला तरी धावत आहे असे लोकांना वाटते तसा देहांतरणामुळे आत्माही एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जात असतो म्हणजे तो अचल नाही, असा भ्रम अज्ञानी लोकांना होत असतो.[३९] तो भ्रम हृदयस्थ व सर्वत्र असलेल्या अचल आत्मारूपी सद्‌गुरुंचे दर्शन झाले की नष्ट होत असतो.

**१२. सर्वधीसाक्षिभूतम् :**

धी म्हणजे बुद्धी आणि सर्वधीसाक्षिभूत असणे म्हणजे सर्वांच्या बुद्धीचा साक्षी असणे होय. परब्रह्मस्वरूप परमेश्वर सर्वांचे अंत:करण म्हणजे मन, बुद्धी, चित्त व अहंकार जाणत असतो. त्याच्याशी एकरूप म्हणजे साक्षात परब्रह्म असलेले सद्गुरुही स्वर्ग, मृत्यू व पाताळ या तिन्ही लोकांतील सर्व जीवांचे सर्व व्यवहार जाणत असतात.

माझ्या अध्यक्षतेखालीच चराचरविश्व निर्माण झाले आहे, असे स्वत: परमेश्वराने म्हटले आहे.[४०] अध्यक्ष म्हणजे सर्वद्रष्टा असलेला तोच त्याच्या मायारूप शक्तिपासून चराचरात्मक जगत उत्पन्न करतो व त्यातील सर्व घडामोडींचा कर्ता-करविता असतो. आत्मरूपाने तो सर्व प्राण्यांच्या हृदयातही असतो. सर्वांच्या अंतरीं असतो म्हणून त्यास अंतर्यामी म्हटले जाते.[४१] ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये व मन (बुद्धी)रूपी अंतरिंद्रिय अशा एकूण अकरा इंद्रियांच्या द्वारे घडणाऱ्या नानाविध कर्मांचा तो साक्षी असतो.[४२]

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

ज्ञानेश्वरीतील देहरूपी क्षेत्राचे वर्णन वाचताना परब्रह्माला सर्वसाक्षी का म्हणतात, ते समजते. त्या वर्णनांत त्याला चैतन्य म्हणून संबोधिले आहे. सर्व देहांमध्ये चैतन्याची जी सत्ता असते तिला चेतना म्हणतात. ती पायांच्या नखांपासून ते थेट मस्तकाच्या केसापर्यंत सदैव जागृत असते. जागृति, स्वप्न, सुषुप्ति या तिन्ही अवस्थांमध्ये तिच्यात अजिबात फरक होत नसतो. तिच्या योगानेच मन, बुद्धी इत्यादिकांना टवटवी असते. अर्थात, सर्व जड आणि चेतन वस्तूंमध्ये असलेली चेतना त्या सर्वांची साक्षी असते.[४३]

देहधारी असतानाच काही लोक योगाभ्यास करून ब्रह्मभावास पोचले, हा श्रीकृष्णांचा अभिप्राय ऐकून अर्जुन आश्चर्यचकित होतो. आपण जे योगमार्गाबाबत विचारणार होतो ते सर्वांतर्यामी देवाने अगोदरच जाणले व सांगावयास सुरुवात केली म्हणून देव 'परचित्तलक्षणांचा रावो' आहे, असे तो म्हणतो.[४४] जगद्गुरु श्रीकृष्ण यांच्याप्रमाणे सद्गुरुही सर्वज्ञ, सर्वसाक्षी असतात. जवळ वा दूर कुठेही असलेल्या शिष्यांना ते प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे मार्गदर्शन करीत असतात, असे श्रीकबीर यांच्या दोह्यांचे पुढील दोन भावानुवाद समजून घेताना स्पष्ट होते : 'प्रेम जयाचे गुरुवरी तो दूर असो वा समीप। भाव मनींचा त्याच्या तैसे होती ते फलद्रूप।।' व 'कोस लाख जरी दूर गुरु, नाम जपावे चित्तीं। शब्दावर ते स्वार जणू, क्षणात येती-जाती।।' संत श्रीज्ञानदेवांनीही 'अंतकाळीं तैसा संकटाचे वेळीं। हरि त्यां सांभाळी अंतर्बाह्य।।' या हरिपाठातील अभंगातून हरिशी स्वरूपत: एकरूप असलेले सद्गुरुही सर्वसाक्षी असल्याचे सूचित केले आहे.

**१३. भावातीतम् :**

श्रीशंकराचार्य यांनी श्रीमद्भगवद्गीतेवर भाष्य केले आहे. दुसऱ्या अध्यायाच्या 'नासते विद्यते भावो नाभावो विद्यते सत:। ' या सोळाव्या श्लोकातील भाव या शब्दाचा अर्थ त्यांनी विशद केला आहे. भाव म्हणजे कधीही न बदलणारे किंवा सदैव सत् असलेले अस्तित्व होय. ज्यात परिवर्तन घडत असते व जे कालांतराने नष्ट होत असते ते सदैव अस्तित्वात नसते म्हणून त्याचा अभाव असतो, असे म्हणतात. या अध्यात्मशास्त्रीय विश्लेषणाधारे भावातीत या सद्गुरु-विशेषाचा अर्थ समजून घेता येतो.

संत श्रीज्ञानदेव यांनी 'अमृतानुभव'मध्ये आधी अज्ञानाचे व नंतर ज्ञानाचेही खंडण केले आहे. आत्मा अज्ञान व ज्ञान या दोन्हींच्या पलीकडे असतो, असे त्यांनी विशद केले आहे. अज्ञान म्हणजे अविद्या होय. ती नसतेच. मी विद्यमानच नाही असे ती स्वत:च स्वत:च्या अविद्या या नावाने सांगत आहे, असे ते म्हणतात.४५ अर्थात ती म्हणजे अज्ञान कधीही भावरूप (अस्तिवात) नसते. याउलट, आत्म्याचे सानुभव ज्ञान झालेले असो वा नसो, आत्मा सदैव असतोच. त्याचे अस्तित्व व्यक्तीच्या ज्ञान-अज्ञान-युक्त भावनेवर अवलंबून नसते. तो स्वभावत: ज्ञानाज्ञानातीत म्हणजे भावाभावातीत असतो. या अर्थाने आत्मा व आत्मस्वरूप सद्गुरु हे भावातीत असल्याचे म्हटले आहे.

प्राथमिक साधकांना मार्गदर्शक ठरेल अशा प्रकारेही भावातीत या संकल्पनेचा अर्थ स्पष्ट करता येतो. भाव म्हणजे शुद्ध सात्त्विक श्रद्धा होय. 'श्रद्धावान लभते ज्ञानम्', असे संस्कृत विधान आहे. श्रद्धा शुद्ध सात्त्विक असेल त्याला आत्मस्वरूप देवाधिदेवाचे सानुभव ज्ञान होते. ज्याच्या अंत:करणांत पुत्रेषणा, वित्तेषणा व लोकेषणा किंवा ऐहिक व पारलौकिक सुखाविषयीचा अपेक्षायुक्त भाव नसेल तोच साधक श्रद्धावान म्हणजे शुद्ध भावयुक्त वा भावातीत ठरतो. 'शुद्ध ज्याचा भाव झाला। दुरी नाही देव त्याला।।' असे म्हणत संत श्रीमुक्ताबाई यांनी जणू भावातीत या शब्दाचा अध्यात्मशास्त्रसंमत अर्थच सूचित करून ठेवला आहे.

संत श्रीनामदेव यांना देव ज्या रूपात रोज भेटत असे तेच देवाचे रूप आहे, असा त्यांचा भाव

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

(समज) झाला होता. परंतु देवाने त्यांना सद्गुरु श्रीविसोबा खेचर यांचेकडे पाठविले व श्रीविसोबांनी त्यांना ते स्वतः व पर्यायाने देवाधिदेव सर्वत्र असल्याचे दाखवून दिले. परिणामी श्रीनामदेवांचा देवस्वरूपविषयक व सद्गुरुस्वरूपविषयक विशिष्ट भाव सर्वत्र समभावात परिवर्तित झाला. म्हणूनच जणू 'देवां नाही रूप देवां नाही नांव। देवां नाही गांव कोठे काही।।' असे सांगत संत श्रीज्ञानदेव यांनी अमुक एका ठिकाणी वा अमुक एका रूपात देव आहे असे मानीत राहू नका व तो सर्वत्र आहे असा अखंडित सद्भाव बाळगून भक्ती करीत रहा, असा सदुपदेश केला आहे.४६ सद्गुरुंकडे मनुष्य म्हणून म्हणजे केवळ स्थूल दृष्टीने पाहणे हे त्यांच्या सर्वव्यापी परब्रह्मस्वरूपाचे सानुभव ज्ञान होण्याच्या आड येत असते, असे त्यांनी पटवून दिले आहे.४७ सद्गुरु हे मनुष्यरूपात आलेले परमेश्वर असतात. त्यांना विशिष्ट रूप, वर्ण, जात, जन्म-मरण वा येणे-जाणे असते, असे वाटत राहणे म्हणजे अंत:करणांत विपरित ज्ञानयुक्त भाव असणे होय. याउलट, सद्गुरु हे चराचरव्यापक निर्गुण, निराकार व अविनाशी परब्रह्म आहेत, असा सानुभव भाव असणे म्हणजे अखंड सद्भावयुक्त वा भावातीत असणे होय.

थोडक्यात, मनुष्यरूपातील सद्गुरुंबाबत असलेला पूज्य भाव ते चराचरव्यापक परब्रह्मस्वरूप असल्याचा अनुभव येतो तेव्हा सद्भाव होतो व ते भावातीत असल्याचे स्पष्ट होते.

**१४. त्रिगुणरहितम् :**

'गुरु' या संज्ञेतील 'गु' आणि 'रु' या दोन अक्षरांचे परम अर्थ सांगणारा भगवान श्रीशंकरोक्त आणखी एक श्लोक गुरुगीतेत आहे. तो असा आहे -

**गुकारं च गुणातीतं, रुकारं रूपवर्जितम्।**
**गुणातीतस्वरूपं च, यो दद्यात्स गुरुः स्मृतः।। क्र.४६।।**

गुरु या शब्दातील गुकार व रुकार हे अनुक्रमे गुरुंच्या गुणातीत व रूपातीत स्वरूपाचे निदर्शक असून आपल्या त्या स्वरूपाची प्राप्ती शिष्याला करून देतात त्यांना गुरु वा सद्गुरु म्हणतात.

सद्गुरुंच्या त्रिगुणरहित किंवा गुणातीत ब्रह्मस्वरूपाचे दर्शन सत्त्व, रज व तम या गुणांच्या आधीन असलेल्या व्यक्तीला होत नसते. हे मार्गदर्शक सत्य 'ब्रह्म इंद्रियां गोचर नसे। गुण गेलिया डोळां दिसे।', अशा सुस्पष्ट शब्दांत संत श्रीएकनाथ यांनी व्यक्त केले आहे. 'त्रिगुणातीत परमात्माच नित्य शुद्ध' असतो, 'गुणकर्ममळकटा फिटला की जीव वैकुंठा(धिशाला)प्रिय होतो' व 'अगुणाचा पूर्ण गुरुराया', असे अनेक शब्द-समूह योजूनही त्यांनी सद्गुरु त्रिगुणरहित असतात म्हणजे काय ते समजावून सांगितले आहे.[४८] स्वत:च्या व सद्गुरुंच्या स्वरूपाबाबतचे हे सत्य जगद्गुरु श्रीकृष्ण यांनीही व्यक्त केले आहे. ते म्हणतात, 'बद्ध मुक्त अवस्था। माझे स्वरूपीं नाहीं तत्त्वतां। हे गुणकार्याची वार्ता। संबंधु तत्त्वतां मज नाहीं।।' व 'गुण ते समूळ मायिक। मी गुणातीत अमायिक।'[४९]

रजोगुणापासून उत्पत्ती होते, सत्त्वगुण सांभाळतो व तमोगुणामुळे मरण येते. अशाप्रकारे मायाजनित तीन गुण जगात सर्वत्र राहाटत असतात. हे तिन्ही गुण त्यजून व्यक्ती 'निस्त्रैगुण' (त्रिगुणरहित, गुणातीत) झाली तर व तरच तिला ब्रह्मज्ञान होते, गुरुकृपाप्राप्ती होते व ती जीवन्मुक्त होते, असे संत श्रीज्ञानदेव यांनी एका अभंगातून मार्गदर्शन केले आहे.[५०] अर्थात, या अभंगात सद्गुरु हे साक्षात ब्रह्म व त्रिगुणरहित असतात, हे त्यांच्या स्वरूपाविषयीचे सत्य अनुस्यूत आहे.

मनुष्यरूपातील सद्गुरु हे चराचर जगताला व्यापून असलेले परब्रह्मस्वरूप असतात. त्यांच्या त्या स्वरूपाला, सकळ सिद्धांना गुरुस्थानीं असलेले भगवान श्रीशंकर यांनी ब्रह्मानंदं, परमसुखदं, केवलं, ज्ञानमूर्तिं, द्वंद्वातीतम्, गगनसदृशं, तत्त्वमस्यादिलक्ष्यम्, एकं, नित्यं, विमलं, अचलं, सर्वधीसाक्षिभूतम्,

भावातीतम् त्रिगुणरहितम् या त्यांच्या अनन्यसाधारण चौदा विशेषांचा उल्लेख करीत विनम्रपणें सोऽहंभावें नमन केले आहे.

सद्गुरुंच्या या स्वरूपाचे आपल्या सर्वांना 'याच देहीं याच डोळां' दर्शन घडो, अशी प्रार्थना करीत श्रीगुरुपौर्णिमेनिमित्त लिहून झालेला हा लेख परमपूज्य श्रीसद्गुरुंच्या व वाचकरूपी जनताजनार्दनाच्या श्रीचरणीं समर्पित करतो.

**संदर्भसूची व टिपा -**

(१) तैत्तीरीयोपनिषद-ब्रह्मवल्ली ८; (२) श्रीहंसराजस्वामीकृत 'वेदेश्वरी', ११.३५५ व ३१४; (३) ज्ञानेश्वरी, १३.५२३; (४) पंचदशी, ११.१००; (५) वेदेश्वरी, ६.२१४-२१६; (६) श्रीशंकराचार्यकृत आत्मबोध, श्लोक क्र.५४; (७) ज्ञानेश्वरी, १३.१३१; (८) तत्रैव, ९.६४ व ६५ ; (९) वेदेश्वरी, १०.३७३; (१०) श्रीएकनाथी भागवत, ७.१९५-१९६; १७.३९-४०; १७.४६; १८.३ व ११.१८२; (११) ज्ञानेश्वरी, १३.५१२; (१२) ज्ञानेश्वरी, ६.४५३-४५४; (१३) श्रीरामदासस्वामी म्हणतात, की 'सकळ धर्मांमध्ये धर्म। स्वरूपीं राहणे हा स्वधर्म।' हे मुख्य साधुलक्षण होय. या लक्षणाने सद्गुरुही युक्त असतात. - दासबोध, ८.९.५४; (१४) श्रीएकनाथी भागवत, १६.१७६; (१५) तत्रैव, ३०.२२०; (१६) ज्ञानेश्वरी, २.२२६; (१७) श्रीएकनाथी भागवत, २८.८४; (१८) सद्गुरु म्हणजे सद्वस्तु जाण। जें समविषमीं व्यापक समान। शीत उष्णतेविना पूर्ण। असें घन कोंदलें।। - दीपरत्नाकर, १४.३१; (१९) सार्थ श्रीलघुवाक्यवृत्ती, ओवी क्र. ८५९ व ८६३; (हा ग्रंथ ट्रान्सलिटरल फाउंडेशन, इंडिया, या वेबसाईटवर उपलब्ध आहे.); (२०) जीवनकलेची साधना, ११वी आवृत्ती, पृष्ठ क्र. ३६; (२१) मनाचे श्लोक, क्र. १९७-१९८; (२२) श्रीज्ञानदेव अभंग : 'पुरुषेंविण नारी..', हरिपाठ अ.क्र.२२ व अभंग 'तें अवघेचि नव्हे..'; (२३) अवधूतगीता, १.२५; (२४) रामगीता, १४.३१-३४; (२५) दीपरत्नाकर, ६.१३-१५ व सार्थ श्रीलघुवाक्यवृत्ती, ओवी क्र.४५४; (२६) श्रीज्ञानदेव अभंग - 'दुरी ना जवळी'; (२७) दीपरत्नाकर, १४.३८; (२८) मनाचे श्लोक, श्लोक क्र. १७९; (२९) ज्ञानेश्वरी, १८.१२२६ ; (३०) दासबोध, ७.२.३१; (३१) श्रीएकनाथी भागवत, ९.१८१; (३२) गीता, १५.७; (३३) गीता, २.२३; (३४) श्रीएकनाथी भागवत, ७.२१५; (३५) श्रीवासुदेवानंदसरस्वतीकृत श्रीदत्तमाहात्म्य : ३१.४४-४५; (३६) वेदेश्वरी, ९.१०६; (३७) श्रीएकनाथी भागवत, १८.२७८; (३८) तत्रैव, २२.२३४-२३६ व ४२७-४२९; (३९) तत्रैव, २२.५८५ व ११.२७२; (४०) गीता, ९.१०; (४१) श्रीएकनाथी भागवत, ११.१८१-१८२; (४२) तत्रैव, १०.६२५; (४३) ज्ञानेश्वरी, १३.१३४-१३५; (४४) तत्रैव, ५.१६३; (४५) अमृतानुभव, प्रकरण ६वे, शब्दखंडण, ओवी क्र. ३८; (४६) श्रीज्ञानदेव अभंग : देव देव म्हणूनि व्यर्थ का फिरशी ।; (४७) पहा गीता-ज्ञानेश्वरी, ९.११ व ओव्या; (४८) श्रीएकनाथी भागवत, ९.१५१, १०.७०३, २०.३३० व २५.२; (४९) तत्रैव, ११.३० व ११.३२; (५०) अभंग : रजापासुनिया जाहली।.

-

**डॉ. विजय बाणकर,**

बी - ११०९, ग्रासलँड हाऊसिंग सोसायटी,

मु. कोल्हेवाडी, पो. खडकवासला (आर.एस्.),

पुणे - ४११०२४, (९३२५५८८०९५)

***

## सद्गुरूंचा अमृतानुभव



**विश्वव्यापक असलेल्या विश्वपालक सद्गुरुची स्तुती करीत असताना ज्ञानदेव म्हणतात- गुरुदेव आपण जगाचे पालनकर्ते आहात. कल्याणाच्या रत्नांची आपण खाणच आहात. भक्तरूप जनवनातील आपण चंदन आहात. आपणच पूजा करण्यास योग्य देव आहात. चतुर अशा चित्तरूपी चकोर पक्षाला आपल्या चंद्रदर्शनाने आनंद होतो. हे श्री गुरुदेवा, आपण ब्रह्माच्या अनुभवसाम्राज्याचे राजे आहात. वेदांच्या अर्थाचे आपण समुद्र आहात. प्रत्यक्ष कामदेव आपणास पाहून मोहीत होतो. शुद्ध भावाने आपलेच भजन करणे योग्य आहे.**

**-नामदेव सदावर्ते**

**म**हासिद्धयोगी नवनाथांच्या परंपरेतून लाभलेले आत्मज्ञान, गुह्यसमाधीधन योगीराज गहिनीनाथांनी त्र्यंबकच्या ब्रह्मगिरीवर आलेल्या बालयोगी निवृत्तीनाथांना दिले. गुरुआज्ञेनुसार ते गुह्यज्ञान निवृत्तीनाथांनी ज्ञानदेवांना देऊन अनुग्रहीत केले. ज्ञानेश्वरांनी ते गुह्य आत्मज्ञान स्वतःजवळ न ठेवता 'कळी गिळितया जीवांच्या' उद्धारासाठी सर्वत्र प्रकट केले. म्हणून म्हणतात-

**प्रगट गुह्य बोले, विश्व ब्रह्मचि केले।।**

आईला फक्त आपल्याच मुलांची काळजी असते पण सद्गुरू माउलीला सर्व विश्वातील मुलाबाळांची काळजी असते. म्हणून ज्ञानदेवाला बहुजन समाज माऊली म्हणू लागला. ज्ञानोबा माऊली मात्र नम्रपणे आपल्या सद्गुरूंचे हे ऋण वाङ्मयातून व्यक्त करतात. ज्ञानदेवांचे सद्गुरू श्री-निवृत्तीनाथ केवळ ज्येष्ठ बंधूच नव्हते तर ते त्यांचे विश्वात्मक देव होते.

सद्गुरूंचे विश्वात्मक रूप समजून घेण्यासाठी माऊलींचा अमृतानुभव हा दशप्रकरणात्मक ग्रंथ समजून घ्यावा लागेल. सद्गुरूबद्दलची त्यांची श्रद्धा, आदर, भक्ती अलौकिक होती. त्यांच्या समग्र काव्यग्रंथांतून त्यांनी गुरुभक्ती प्रगट केली आहे. अमृतानुभवातील सद्गुरुस्तवनात श्रीगुरुस्वरुपाचे विश्वात्मक गुढवर्णन आहे. भावार्थदीपिकेतील अनेक ओव्यांतून अत्यंत नम्रतापूर्वक गुरुभक्तीचे प्रगटीकरण आहे.

**आतां विश्वात्मकु हा माझा। स्वामी श्रीनिवृत्तिराजा।**
**तो अवधार वाक्यपूजा। ज्ञानदेवो म्हणे।।**

विश्वव्यापक असलेल्या विश्वपालक सद्गुरुची स्तुती करीत असताना ज्ञानदेव म्हणतात- गुरुदेव आपण जगाचे पालनकर्ते आहात. कल्याणाच्या रत्नांची आपण खाणच आहात. भक्तरूप जनवनातील आपण चंदन आहात. आपणच पूजा करण्यास योग्य देव आहात. चतुर अशा चित्तरूपी चकोर पक्षाला आपल्या चंद्रदर्शनाने आनंद होतो. हे श्री गुरुदेवा, आपण ब्रह्माच्या अनुभवसाम्राज्याचे राजे आहात. वेदांच्या अर्थाचे आपण समुद्र आहात. प्रत्यक्ष कामदेव आपणास पाहून मोहीत होतो. शुद्ध भावाने आपलेच भजन करणे योग्य आहे.

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

संसाररुपी हत्तीचे गंडस्थळ फोडणाऱ्या श्रीगुरो, जगाचे उत्पत्तीस्थान आपणच आहात. संसाररूपी अंधाराचा नाश करणारे सूर्य आपण आहात. चतुरपणे ज्ञान देऊन आपण शिष्याच्या विद्यारूप कमलाचा विकास करता. ज्ञानदेव अशी सद्‌गुरूंची वाक्पूजा करतात.

श्रीमद्‌भगवत्‌गीतारुपी गुप्त धन संस्कृत भाषेच्या कडी-कुलूपातून सोडवून मराठी भाषेत मराठी जनांच्या झोपडीपर्यंत पोहोचविण्यासाठी ज्ञानेश्वरी अर्थात भावार्थदीपिका केवळ सद्‌गुरुकृपेमुळेच निर्माण झाली, असे ज्ञानराज म्हणतात. मला कारणीभूत करून धर्माचा ठेवा जे माझे गुरू निवृत्तीनाथ यांनी माझ्याकडून संस्कृतभाषारूपी कठीण किनारे फोडून मराठी शब्दरुपी पायऱ्यांचा घाट बांधला. हा ज्ञानेश्वरी ग्रंथ माझ्या गुरुच्या कृपेचे वैभव आहे, असे ते नम्रपणे म्हणतात.

**तैसे श्रीनिवृत्तिनाथांचें। गौरव आहे जी साचें।**
**ग्रंथु नोहे हैं कृपेचें। वैभव तिये ।। १८.१७५०**

अध्यात्मशास्त्रात अंतर्मुख वृत्ती असलेलेच खरे अधिकारी असतात पण ज्ञानेश्वरीच्या शब्दचातुर्यामुळे लोक सुखी होतील. गुरुदेवांनीच मला निमित्त करून ह्या ग्रंथाची रचना केली. हा गीताग्रंथ वेदार्थसागर असून स्वतः भगवंतांनी अर्जुनाला स्वमुखाने सांगितला आहे. अशा गीतेचे मराठी भाषेतून अर्थ सांगण्याचे काम गहन आहे. मी स्वतः मतिमंद आहे. या अमर्याद गीतेचे मला आकलन कसे होणार! चिलटाने आकाश कसे कवटाळावे? ऐसे जे अगाध। जेथ वेडावती वेद। तेथ अल्प मी मतिमंत। काय होय? फक्त श्रीनिवृत्तीनाथांचा मला आधार आहे. त्यांच्या कृपेमुळेच मी या गीतार्थाचे अनुवादन करील. त्यांनी बोलविले म्हणून मी बोलतो आहे. ज्याप्रमाणे लाकडी कळसूत्री बाहुली सूत्रधाराची दोरी नाचविल, तशी नाचते.

**आतां देईजो अवधान। तुम्ही बोलविल्या मी बोलेन।**
**जैसे चेष्टे सूत्रधिन। दारू यंत्र।।**

कामधेनु ही ज्याची आई आहे त्याला न मिळण्यासारखे काय आहे? आणि म्हणूनच मी हा ग्रंथ करण्यास प्रवृत्त झालो आहे. भगवंतांनी गीतेत सांगितलेले ज्ञान बुद्धीला देखील आकलन करण्यास कठीण आहे. पण माझे गुरू श्रीनिवृत्तीनाथ यांच्या कृपारुपी दिव्याच्या उजेडात मी ते पाहीन. जर अतिंद्रिय ज्ञानाचे बळ प्राप्त होईल, तर जे दृष्टिला दिसत नाही ते डोळ्यांशिवाय पाहता येते.

**तैसी सद्‌गुरुकृपा होये। तरी करिता काय आपु नोहे।**
**म्हणऊनि ते अपार माते आहे । ज्ञानदेवो म्हणे ।।**

भगवंतांनी अर्जुनाला गीताप्रसंगी आपले विराट स्वरूप दाखविले. तत्पूर्वी अर्जुनाला दिव्यदृष्टी दिली. त्या विराट स्वरुपाचे वर्णन ज्ञानराजांनी मराठी भाषेत केले ते अप्रतिम व रसाळ आहे. ते केवळ सद्‌गुरु कृपेमुळेच शक्य झाले असे ज्ञानराज नम्रपणे सांगतात-

**प्रांजळ ओवी प्रबंधें। गोष्टी सांगिजेल विनोदें।**
**निवृत्तीपाद प्रसादे। ज्ञानदेवो म्हणे।।**
**भरोनि सद्‌भावांची अंजुळी। मियां ओविया फुले मोकळी।**
**अर्पिली अंध्रियुगुली। विश्वरूपांच्या।।**

शोकग्रस्त जीवाला ब्रह्मस्थिती प्राप्त करून देण्याचे सामर्थ्य सद्‌गुरूसेवेत आहे. खरा गुरुभक्त

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

गुरुसेवेसाठी जीवन अर्पण करतो. त्याच्या ध्यानी-मनी गुरुसेवा असते. देहत्यागानंतरही देहातील पंच-महाभूते गुरुसेवेसाठी खर्च व्हावी, अशी त्याची इच्छा असते. जन्मोजन्मी गुरुसेवा घडावी असे त्याला वाटते. अमानित्व, दंभरहितता, अहिंसा, सत्य सहनशीलता, सरळपणा, सेवा, अंतर्बाह्य शुद्ध मन, स्थैर्य, अंतःकरण निग्रह, वैराग्य, अहंकाराचा अभाव, अनासक्ती, अलोलुपता, चित्तसमत्व इत्यादि सद्गुणांचा पुष्पहार तो सद्गुरुला अर्पण करतो.

आपल्या शुद्ध अंतःकरणाचा चौरंग करून त्यावर श्रीगुरूंच्या पाऊलांची स्थापना करू. श्रीगुरू व आपण एक आहोत, अशा ऐक्यरूपी ओंजळीत इंद्रियरूपी कमळकळ्या भरून त्या पुष्पांजळीचे अर्घ्य श्रीगुरूंच्या चरणावर अर्पण करू. एकनिष्ठारूप स्वच्छ पाण्याने स्नान घालून त्यांना स्नेहभावाचे गंध लावू-श्रीगुरुप्रेमरुपाच्या शुद्ध सोन्याचे वाळे सद्गुरुच्या पायात घालू. आनंदरूप सुवासिक अष्टसात्विक भावाची अष्टदळकमळे श्रीगुरूंच्या पायांवर वाहू. अहंवृत्तीचा धूप सद्गुरूचरणाजवळ जाळू. आत्मज्ञानरुपी बोधवृत्तीच्या तेजाने सद्गुरूंस ओवाळू. श्रीगुरुच्या दोन्ही पायांत माझे शरीर व प्राण या दोन खडावा करून घालू.

जे ज्ञानाला कळत नाही, ध्यानासही सापडत नाही असे जे निर्विषय ब्रह्म ते सद्गुरूंच्या बोलण्यात सापडते. श्रीगुरुचरणातील सुगंध ज्यावेळी लाभतो, त्यावेळी भाग्य वाचेच्या ठायी येते. सद्गुरुकृपेमुळेच अध्यात्म ज्ञानातून परमात्मप्राप्ती होते.

**तैसे श्रीनिवृत्तिराजे। अज्ञानपण हे माझे।**
**आणिले ओजे। ज्ञानाचिया।।**
**म्हणोनि रिकामे तोंड। करूं गेले बडबड।**
**की गीताऐसे गोड। आतुडलें।।**

सद्गुरुकृपेचे दैव जर अनुकूल असेल, तर वाळूचीसुद्धा रत्ने होतील. आयुष्य जर अनुकूल असेल तर शस्त्रास्त्रांसह कोणी जीव घ्यावयास आता तर तोही प्रेमळपणाने वागेल. त्याप्रमाणे श्रीगुरू जेव्हा एखाद्याचा अंगिकार करतात, तेव्हा त्याचे जीवित सुखमय होते.

श्रीज्ञानदेवांनी सद्गुरु निवृत्तीनाथांचे गणपतीच्या रूपकाने स्तवन केले आहे. गणपतीच्या स्मरणाने श्रीशंकरांनी त्रिपुरासुराचा वध केला. त्यामुळे देवांची मुक्तता झाली. गणयतीचे वक्रतुंड, सूक्ष्म डोळे, हालणारे कान, नृत्य क्रीडेतील कौशल्य या सर्वांचा उपयोग रूपकात करून संत ज्ञानदेवांनी आपल्या सद्गुरूंचे आध्यात्मिक सामर्थ्य वर्णन केले आहे.

**तैसा तुझिया प्रणती। मी पूर्ण जाहलों श्रीनिवृत्ति।**
**आता आणीन व्यक्ती। गीतार्थु तो।।**

दृष्टांत, काव्य, उपमा, अलंकार, शब्दसामर्थ्य, रूपकांची रेलचेल असलेला अलौकिक ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लिहून झाल्यावर ज्ञानदेव आपल्या सद्गुरूंची नम्रतापूर्वक स्तुती करताना म्हणतात- सद्गुरु सामर्थ्यामुळेच ही भावार्थदीपिकेची रचना मी करू शकलो. संस्कृतप्रचुर शब्दांनी ते सद्गुरु स्तवन करतात.

ज्ञानेश्वरीच्या अठराव्या अध्यायातील नमनाच्या त्या दहा ओव्या व शेवटच्या पसायदानाच्या नऊ ओव्या मनाला अप्रतिम आनंद देणाऱ्या आहेत. अनेक रूपकें, विशेषणांनी सद्गुरुची स्तुती ते करतात. ते



म्हणतात- भ्रमाने वेडा झालेला माणूस जसे बडबडतो, त्याप्रमाणे मी तुमचे वर्णन करतो ते हे गुरुमाऊली तू मला क्षमा कर, तुमच्या संबंधाने काहीही न बोलणे हीच तुमची स्तुती व काहीही न करणे हीच पूजा होय. आपण अत्यंत समर्थ आहात. सगळ्या अमंगलाचा आपण सहज नाश करता. वेदांचे तात्पर्य आपणच आहात. आपली सेवा करणारा इष्ट फळ मिळवितो. त्या आपला जयजयकार! आपण स्वयंप्रकाशी आहात. जगद्रुपी मेघ ज्यात संचार करतात ते आकाश आपणच आहात. आपण विश्वाच्या आरंभीची मूळ पीठिका आहात. त्या विश्वाचा बोधदेखील आपणच करता, त्या आपला जयजयकार! आपण अचल आहात. चंचल चित्ते आपल्या ठिकाणी स्थिर होतात. जणू काय ती उदरी सामावल्याने आपले उदर विशाल झाले आहे. विश्व प्रगट करणे ही तर आपली आवडती क्रीडा. त्या आपला जयजयकार!

**जयजय देव निर्मळ। निजजनाखिलमंगळ।**
**जन्म जरा जलद जाळ। प्रभंजन।।**
**जयजय देव निष्कळ। स्फुरद मंदानंदबहळ।**
**नित्यनिरस्ताखिल मळ। मूळभूत।।**

संस्कृतप्रचुर भाषेतील या सद्‌गुरुस्तवनाच्या ओव्या सहज वाचकांना आनंद देतात. भावार्थदीपिकेच्या शेवटी आपल्या विश्वात्मक देवाकडे संत ज्ञानदेव पसायदान मागतात. खळांचा कुटिलपणा नाहीसा व्हावा. त्यांना सत्कर्माची आवड निर्माण व्हावी. सर्व प्राणीमात्राची मैत्री व्हावी. पापाचा अंधार जाऊन स्वधर्मरूपी सूर्याचा उदय व्हावा, ज्याला जे हवे असेल त्याला ते मिळो. ईश्वरनिष्ठांचे समुदाय सर्वत्र आढळो. सज्जन सर्वत्र दिसो, त्रैलोक्य सुखी होवो. सर्वांनी आदिपुरुषावर निष्ठा ठेवावी. हा ग्रंथ ज्याच्या जीवीचे जीवन झाला असेल, त्यांनी इहलोक व परलोकीच्या भोगावर विजय मिळवून सात्त्विक वैराग्याने झळाळत असावे.

**येथ म्हणे श्रीविश्वेश्वरावो। हा होईल दानपसावो।**
**येणें वरें ज्ञानदेवो। सुखिया झाला।।**

ज्ञानेश्वरी प्रमाणेच 'अमृतानुभव' या स्वतंत्र ग्रंथरचनेतही सद्‌गुरू निवृत्तीनाथांवर आपली भक्ती ज्ञानदेवांनी प्रगट केली आहे. सद्‌गुरुस्तवन या प्रकरणात ज्ञानदेव म्हणतात-

**मोडोनि मायाकुंजरू। मुक्तमोतियाचा वोगरू।**
**जेवविता सद्‌गुरू। निवृत्ती वंदूं।।**

शिष्याचा नित्यमुक्त आत्मा मायारूप अज्ञानाच्या हत्तीने आच्छादित असतो. त्या मायारूप हत्तीस आत्मज्ञानरूपी शस्त्रांनी नाहीसे करून स्वरूप आत्मज्ञानरूपी मोती हेच अन्न. त्याचे भोजन वाढून शिष्यास

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

अनुभवरुपाने जेवू घालणाऱ्या सद्गुरू निवृत्तीनाथांना मी वंदन करतो, असे ज्ञानदेव म्हणतात.

**निवृत्ति जया नांव। निवृत्ति जया बरव।**

**जया निवृत्तिची राणीव। निवृत्तिची।।**

व्यवहारामध्ये एखादा निवृत्ती नावाचा राजा सापडेल. त्याचे आचरण मात्र प्रवृत्तीनुसार असते. असा पोकळ, निरर्थक नामधारी माझा सद्गुरू निवृत्ती नाही. तर त्याचे आचरण निवृत्ती. त्याचे सर्व राज्यसुद्धा निवृत्ती, अहंवृत्ती शून्य, ज्ञानपूर्ण, नित्य, सिद्ध, शुद्ध, बद्धमुक्त असे माझे सद्गुरू निवृत्ती असून, त्याचे अनुग्रहीत सर्व जीव स्वानंदसाम्राज्याचा अनुभव घेतील,

**आतां ज्ञानदेवो म्हणे। श्रीगुरुप्रणामें येणें।**

**फेडिलीं वाचाऋणें। चौही वाचाची।।**

ज्ञानेश्वर महाराज म्हणतात- आता मी श्रीगुरूंना नमस्कार केल्याने परा, पश्यंति, मध्यमा, वैखरी या चारी वाचारुपी ऋणातून उत्तीर्ण झालो आहे. प्रवृत्तीचा निरास करून निवृत्ती पदाच्या पदवीस आलेले माझे सद्गुरु निवृत्ती नाही, तर प्रवृत्ती संबंधावाचून स्वतः सिद्ध नित्य निवृत्तीच असे माझे सद्गुरू आहेत. त्यांना वंदन करून अविद्या-रूप चारी वाणीतून मी सुटलो आहे.

सद्चिद्आनंदस्वरूप परमात्म्यास एकटेपणामध्ये करमेना म्हणून गुरुशिष्य निमित्ताने आपणच लहान मोठे नटले व लहान आपण मोठ्या आपणास शिष्यत्वाने शरण गेले. लहानाची मोठ्याने कीव करून गुरुरुपाने आपणच आपल्याला बोध करू लागले. अशा सद्गुरू श्री निवृत्तीनाथास ज्ञानदेव नमस्कार करीत आहे.

एका अभंगात ज्ञानराज निवृत्तीनाथांचे महात्म्य सांगतात-

**सकळ तीर्थे निवृत्तीच्या पायी।**

**तेथे बुडी देई माझ्या मना।।१।।**

**आतां मी न करी चित्ताचें भ्रमण।**

**वृत्तीसी मार्जन केले असे।।२१।।**

**एकार्णव जाला तरंगु बुडाला।**

**तैसा देह जाला एकरूप।।३।।**

**बापरखुमादेवीवरें विठ्ठलें नवल पै केले।**

**तारूं हरविले मृगजळी।।४।।**

**संत ज्ञानेश्वर महाराज व सद्गुरू निवृत्तीनाथांना वंदन!**

**- नामदेव सदावर्ते,**

पसायदान बंगला, मानकर मळा,

मखमलाबाद, नाशिक

९४२०८९१६८१

***



## आध्यात्मिक उन्नतीचा सण

**गुरुपौर्णिमा म्हणजे आत्मप्रकाशाचा उत्सव आहे. हा दिवस आपल्याला सतत आठवण करून देतो की आपण कोणाचे तरी ऋणी आहोत, की आपले जीवन कोणीतरी घडवले आहे. आपल्याला प्राप्त ज्ञानाचे उपकार विसरता कामा नये. हा दिवस आपल्याला नम्रता, साधना, संयम आणि ज्ञान या मूल्यांची पुन्हा पुनर्स्थापना करायला शिकवतो. म्हणूनच ही पौर्णिमा दिव्य आहे, आणि तिचे स्मरण जीवनाला सदैव उन्नत बनवते. गुरू म्हणजे जीवनाचा पाया, ज्याच्या आधारावर आपण आपली उंची ठरवतो. अशा ह्या दिव्य गुरुंना शतशः वंदन.**

**-न्या. बंडोपंत दि. कुलकर्णी, पुणे**

**गु**रुपौर्णिमा ही एक दिव्य परंपरा आणि आध्यात्मिक उन्नतीचा सण आहे. हा सण वा पौर्णिमा फक्त भारतात आणि इतर देशांतील भारतीय वंशाचे लोक साजरा करतात. भारतीय संस्कृती ही ऋषिमुनींच्या ज्ञानसंपदेमुळे उदात्त झाली आहे व त्याचा असर भारतीयांच्या देहातील सजातीय पेर्शीमध्ये असलेले रसायन म्हणजे डीएनएत आहे. म्हणून या संस्कृतीचा ऱ्हास कधीही होणार नाही. या महान परंपरेत व संस्कृतीत गुरुचे स्थान सर्वोच्च आहे. ज्ञानाचा प्रकाश देणारा, अंधारातील वाट दाखवणारा, जीवनाचा अर्थ समजावणारा आणि आत्मा जागवणारा म्हणजे गुरू. अशा गुरूंच्या सन्मानार्थ जेव्हा चंद्र पूर्ण भरलेला असतो, त्या आषाढ शुद्ध पौर्णिमेच्या दिवशी गुरुपौर्णिमा साजरी केली जाते. हा केवळ एक सण नसून शिष्याच्या हृदयातील कृतज्ञतेची भावना व्यक्त करण्याचा एक परम पवित्र दिवस आहे.

**गुकारस्त्वन्धकारस्तु रुकार स्तेज उच्यते।**
**अन्धकार निरोधत्वात् गुरुरित्यभिधीयते।।**

म्हणजेच, 'गुकार' म्हणजे अंधार, आणि 'रुकार' म्हणजे ज्ञानतेज जो अंधाराला (ज्ञानाचा प्रकाश देऊन) रोखतो व प्रकाशमय करतो त्याला गुरू म्हणतात.

भारतीय परंपरेत गुरू हा शब्द गु म्हणजे अंध:कार आणि रू म्हणजे निवारण करणारा अशा प्रकारे समजला जातो. त्यामुळे गुरू म्हणजे अज्ञानाचा अंध:कार दूर करणारा प्रकाश होय. वेद, उपनिषदे, भगवद्गीता, नाथ संप्रदाय, शंकराचार्यांची तत्वचिंतनशृंखला हे सर्व गुरु-शिष्य परंपरेवर उभे आहेत. आषाढ पौर्णिमा ही व्यासपौर्णिमा म्हणूनही ओळखली जाते. कारण याच दिवशी वेदव्यासांचा जन्म झाला, ज्यांनी वेदांचे संकलन, महाभारताची रचना, अठ्ठावीस पुराणांची निर्मिती केली आणि भगवद्गीतेचे भाष्य दिले. त्यामुळे हा दिवस ज्ञानसंपन्न गुरूंना अभिवादन करण्याचा आणि आत्मशुद्धीसाठी संकल्प घेण्याचा शुभ मुहूर्त मानला जातो.

गुरुपौर्णिमेचे महत्त्व विविध स्तरांवर आहे. आध्यात्मिक पातळीवर हा दिवस आत्मशुद्धीचा आणि आत्मदर्शनाचा आहे. आपल्या जीवनातील अज्ञानरूपी अंध:कार नष्ट करून आत्मप्रकाशात नेणाऱ्या गुरूंना वंदन करण्याचा हा क्षण. अध्यात्मिक गुरूंचे कार्य हे फक्त बाह्य जगाचं ज्ञान देण्यापुरतं मर्यादित नसते, तर ते अंतरंगाची जागृती करून शिष्याला आत्मस्वरूप जाणण्यास मदत करतात. माउली म्हणते

**गुरू हा संतकुळीचा राजा।**
**गुरु हा प्राणविसांवा माझा।**

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

**गुरुवीण देव दुजा।**
**पाहातां नाहीं त्रिलोकीं।।**
**म्हणूनच संत तुकाराम म्हणतात,**
**सदगुरुवांचोनी सापडेना सोय। धरावे ते पाय आधी आधी।।**
**आपणांसारिखे करिती तात्काळ। नाही कळवेळ तयालागी।।**
**लोहपरिसाची नसाहे उपमा। सद्‌गुरू महिमा अगाध।।**
**नामा म्हणे खेचर पायी । गुरु वाचुनि दैवत नाही।।**

संत जनाबाई म्हणते

**स्वरुप हें अगोचर। गुरू करिती गोचर।।**

भारतीय इतिहासातील अनेक उदाहरणे गुरु-शिष्य नात्याच्या गौरवाची साक्ष देतात. रामकृष्ण परमहंस आणि विवेकानंद, दत्तात्रेय आणि त्यांचे चोवीस गुरू, नामदेव आणि विसोबा खेचर, ज्ञानेश्वर माऊली आणि निवृत्तीनाथ वगैरे ही सर्व उदाहरणे आजही आपल्याला प्रेरणा देतात. गुरुपौर्णिमा या दिवशी अशा महान गुरुंच्या चरणांशी आत्मिक जोड निर्माण होते आणि आपण आपल्या जीवनात गुरूंच्या स्थानाची जाणीव ठेवतो. गुरू म्हणजे केवळ शाळेतील शिक्षक नव्हे, तर तो जो आपल्या जीवनाला दिशा देतो, अंतर्मनात जागृती घडवतो, चुकीच्या वाटेपासून परावृत्त करतो आणि जीवनाच्या उद्दिष्टाचा ठाव लावतो. तो आपल्या शिष्याच्या जीवनाला एक दिशा देतो. श्रीमद्‌भगवद्‌गीतेत भगवान श्रीकृष्ण हे अर्जुनाचे गुरू आहेत. युद्धभूमीत अर्जुन संभ्रमात असताना श्रीकृष्ण त्याला कर्म, भक्ती आणि ज्ञान यांचा समन्वय साधणारा मार्ग दाखवतात. हेच एक आदर्श गुरु-शिष्य संवादाचे उदाहरण आहे. गुरुपौर्णिमेच्या दिवशी आपण आपल्या जीवनात अशा मार्गदर्शकाचा शोध घेतो किंवा आधीच लाभलेला गुरू आठवून त्याच्या चरणी कृतज्ञता व्यक्त करतो.

गुरुपौर्णिमेचे वैज्ञानिक व मानसिक महत्त्वही आहे. आषाढात चंद्राच्या स्थितीचा परिणाम मानवी मनावर अधिक तीव्र असतो. अशावेळी जर मन शांत, सकारात्मक आणि शुद्ध विचारांनी भरलेले असेल, तर त्या दिवशी केलेले संकल्प आणि ध्यान अधिक प्रभावी ठरतात. म्हणून योगसाधना, ध्यान, जप, व्रत, गुरुभजन हे या दिवशी अधिक प्रभावी मानले गेले आहे. अनेक साधक या दिवशी गुरुकृपेने दीक्षा घेतात किंवा नवे आध्यात्मिक संकल्प करतात. गुरुपौर्णिमा म्हणजे शिष्याच्या जीवनात नवीन अध्याय सुरू होण्याची सुंदर संधी. सामाजिक पातळीवरही गुरुपौर्णिमा अत्यंत महत्त्वाची आहे. आजच्या युगात शिक्षणाचा व्याप वाढला असला, तरी शिक्षणासोबत संस्कार देणारे गुरू दुर्मिळ झाले आहेत. आधुनिक काळात गुरुपौर्णिमा साजरी करताना आपण फक्त परंपरा म्हणून नव्हे, तर गुरुंच्या कर्तृत्वाची खरी जाणीव ठेवून हे नातं अधिक दृढ करायला हवे. शाळांमध्ये शिक्षकांचा सन्मान करणे, अध्यापकांना अभिवादन करणे हे गुरुपौर्णिमेच्या माध्यमातून होणारी सकारात्मक उपक्रम आहेत.

गुरुपोर्णिमा या दिवशी गुरूंना पुष्पहार अर्पण करून, त्यांच्या पायावर लीन होऊन, त्यांची वचने, उपदेश ध्यानात ठेवून आपले जीवन सुसंस्कृत करणे ही खऱ्या अर्थाने गुरुपूजा होय. काही संप्रदायांत या दिवशी गुरुंची पूजा करणे, त्यांना दक्षिणा अर्पण करणे, उपदेश ऐकणे ही परंपरा असते. गुरूर्ब्रह्मा गुरूर्विष्णुः गुरूर्देवो महेश्वरः या मंत्राने गुरुचे दिव्यत्व अधोरेखित होते. गुरुचरणांमध्ये नतमस्तक होऊन जेव्हा आपण नम्रतेने शिक्षण घेतो, तेव्हा आत्मज्ञान प्राप्तीचा मार्ग सुकर होतो.

आधुनिक काळात गुरुपौर्णिमा साजरी करताना केवळ कर्मकांडापुरते मर्यादित न राहता, तिचा खरा

आध्यात्मिक आणि बौद्धिक अर्थ समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे. आज गुरू हे केवळ व्यक्ती न राहता विचार होऊ लागले आहेत. पुस्तकांचे ज्ञान, अनुभवाचे ज्ञान, आत्मशोधाची प्रेरणा, ही जीवनातील गुरुंची रूपे आहेत. म्हणूनच आपण आपल्या प्रत्येक अनुभवाकडून शिकणं, प्रत्येक संकटाकडून दिशा मिळवणं आणि प्रत्येक अपयशातून धैर्य घेणं हेही गुरुपौर्णिमेच्या अर्थाशी समरस होणं होय. शिष्य म्हणून आपली भूमिका कृतज्ञतेची असायला हवी. केवळ गुरुंची स्तुती करून थांबणे नाही, तर त्यांच्या शिकवणुकीचे पालन करून, त्यांच्या आदर्शांचे अनुकरण करून, आपण त्यांची शिकवण आपल्या वागण्यात आणल्यासच आपण खरे शिष्य ठरतो. गुरुशिष्य नाते केवळ एक दिवसापुरते नाही, तर अखंड टिकणारे असते. गुरुपौर्णिमा हे त्या नात्याचे, त्या प्रेरणेस्पर्शाचे, त्या ज्ञानप्रकाशाचे आणि त्या आत्मिक अनुबंधाचे साक्षात स्मरण आहे.

भारताच्या विविध संप्रदायांत गुरुपौर्णिमा वेगवेगळ्या पद्धतीने साजरी होते. बौद्ध धर्मात या दिवशी भगवान बुद्धांनी आपल्या पहिल्या शिष्यांना धम्माचा उपदेश दिला होता, त्यामुळे ही धम्मचक्र प्रवर्तन दिन म्हणून ओळखली जाते. नाथ संप्रदाय, वारकरी संप्रदाय, दत्त संप्रदाय, शीख, जैन, शैव, वैष्णव अशा सर्व पंथांमध्ये या दिवशी गुरूंना अत्युच्च स्थान दिले जाते. महाराष्ट्रात ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, समर्थ रामदासांचे मनाचे श्लोक, योगसंधान यांचे वाचन या दिवशी केले जाते. या दिवशी दत्त संप्रदायात दत्तगुरुंचे पूजन, नामस्मरण, ध्यान व सामुदायिक जपाचे आयोजन केले जाते. नर्मदा परिक्रमा, गुरूगीतेचे पठण, गुरूंचे जीवनचरित्र यांचे वाचन करून भक्तगण आपल्या मनोभावाने गुरुपूजा करतात. शंकराचार्य परंपरेत गुरुशिष्य संवाद, वेद-अध्ययन, ध्यान, ब्रह्मचिंतन यांवर भर दिला जातो. ह्या सर्व उपक्रमांचा उद्देश एकच, ते म्हणजे गुरुंच्या शिकवणुकीला आपल्या जीवनात रूजवणे. गुरुपौर्णिमा ही एक साधना आहे. ही साधना आहे अंतर्मुख होण्याची, नम्र होण्याची, आणि आत्मज्ञानाच्या शोधाची. ही साधना आहे आपल्या जीवनाला अर्थ देणाऱ्या त्या व्यक्तीचे स्मरण करण्याची ज्याच्या कृपेने आपण आपले स्वरूप ओळखू शकतो. गुरूंचे कार्य आपल्या आयुष्यात एक आदर्श घडवण्याचे असते. त्यांच्या सान्निध्यात आपण उन्नत होतो. त्यांच्या ज्ञानामुळे आपण निराशा, अंधःकार, दुःख यांच्यावर मात करू शकतो.

गुरुपौर्णिमा म्हणजे आत्मप्रकाशाचा उत्सव आहे. हा दिवस आपल्याला सतत आठवण करून देतो की आपण कोणाचे तरी ऋणी आहोत, की आपले जीवन कोणीतरी घडवले आहे, आणि की आपल्याला प्राप्त ज्ञानाचे उपकार विसरता कामा नये. हा दिवस आपल्याला नम्रता, साधना, संयम आणि ज्ञान या मूल्यांची पुन्हा पुनर्स्थापना करायला शिकवतो. म्हणूनच ही पौर्णिमा दिव्य आहे, आणि तिचे स्मरण जीवनाला सदैव उन्नत बनवते. गुरू म्हणजे जीवनाचा पाया, ज्याच्या आधारावर आपण आपली उंची ठरवतो. अशा ह्या दिव्य गुरुंना शतशः वंदन, आणि गुरुपौर्णिमेच्या दिवशी आपण सर्वांनी आपल्या जीवनातील गुरुंच्या चरणांशी आत्मिक नाते दृढ करून, त्यांच्या शिकवणीला प्रत्यक्षात आणण्याचा संकल्प करू या हीच खरी गुरुपूजा ठरेल. या गुरुपोर्णिमा पर्व काळी सद्गुरू जंगलीदास महाराज यांच्या त्रिकाल वंदनीय व स्मरणीय चरण कमळावर मस्तक ठेवून साष्टांग दंडवत व त्यांच्या कृपादृष्टी व आशीर्वाद कायम आमच्या मस्तकी असावेत ही प्रार्थना.

**आत्मा मालिक। कृष्णार्पणमस्तु।**

**-बंडोपंत दि. कुलकर्णी,**
सोलापूर
जिल्हा न्यायाधीश, पुणे

***

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

## विसरू कसा मी..



सद्गुरूमहिमा वर्णिताना श्री आदि शंकराचार्यांनी लिहिलेले 'श्रीगुरुपादुकाष्टक' विख्यात ठरले. गुरुचरणांची महती आदि शंकराचार्य त्यात कथन करतात. गुरुशिष्य परंपरेत गुरुचरणांचे मोल, महत्त्व असाधारण आहे.

जडभास मनाचा लोपतो, संगतीने विरागी भाव जागतो अन् साक्षात परम परमात्मा ज्यामुळे भेटतो त्या सद्गुरूंच्या गुरूपादुका अनमोल. त्यांना कसे विसरून चालेल? सद्भक्ती भावनेचा जो भुकेला, जो सर्वदा जनांत वावरतो त्यांच्या गुरूपादुकांना विसरणे अशक्य.

**-डॉ. सुनील शिंदे**

**गु**रू महिमा अपार. गुरुस्थान आधार. गुरूज्ञान अगाध. गुरूनाम ही गुरूधाम. गुरू आस्थेचे स्थान. गुरू स्नेहाचे स्थान. गुरू आपुलकीचे स्थान. गुरू जिव्हाळ्याचे स्थान.

गुरू दिशा, गुरू विसावा, गुरू आसरा, सहारा. गुरू साक्षात परमात्मा. गुरू परमपावन शिवालय. गुरू विश्वास, गुरू श्रद्धा अपार. गुरुचरण परमक्षेत्र. गुरू स्वीकृती प्रकृती, गुरू जागृती. गुरू तीर्थ वंद्य, गुरू मोक्ष सिद्ध. गुरू निजशांतीदाता. गुरू आत्माराम, आत्मा मालिक! गुरू असतात समबुद्धी. गुरू तर नित्यानंद. गुरू विश्रांतीचा ठाव. गुरू विश्वासाचा ठेवा, गुरू ज्ञानाचा ठेवा, महासुखाचा ठेवा. सद्गुरू पूर्व पुण्याईचा ठेवा.

गुरू संत मायबाप. गुरू उद्धार कीर्ती. गुरू उद्धारकर्ता. गुरू साक्षात् मोक्ष सायुज्य दाता. गुरू विश्वासाचे धाम. गुरू शुद्ध सत्वगुणी, गुरू त्रिविध तापहर्ते, गुरु भाग्यविधाते.

सद्गुरूमहिमा वर्णिताना श्री आदि शंकराचार्यांनी लिहिलेले 'श्रीगुरुपादुकाष्टक' विख्यात ठरले. गुरुचरणांची महती आदि शंकराचार्य त्यात कथन करतात. गुरुशिष्य परंपरेत गुरुचरणांचे मोल, महत्त्व असाधारण आहे.

जडभास मनाचा लोपतो, संगतीने विरागी भाव जागतो अन् साक्षात परम परमात्मा ज्यामुळे भेटतो त्या सद्गुरूंच्या गुरूपादुका अनमोल. त्यांना कसे विसरून चालेल? ज्यांच्यामुळे परब्रह्म स्थिती बाणावी, सद्बोध व्हावा, जो चराचरांत व्यापलेला, अशा सद्गुरू पादुका थोर. अखंड भेटीचा लाभ होतो, सद्भक्ती भावनेचा जो भुकेला, जो सर्वदा जनांत वावरतो त्यांच्या गुरूपादुकांना विसरणे अशक्य. आपले अपराध कोटी असूनही मनात येऊ न देता पोटी घेणारा आणि प्रबोधकरिता श्रमी असणाऱ्या सद्गुरूंच्या पादुका आपल्यासाठी अनमोल ही भावना स्तोत्र रचनाकर्त्यांची आहे.

**आदि शंकराचार्य श्री गुरू पादुकाष्टकात म्हणतात :**

**ज्या संगतीनेंच विराग झाला।**
**मनोदरींचा जडभास गेला।**
**साक्षात् परात्मा मज भेटविला।**
**विसरुं कसा मी गुरुपादुकांला।।१।।**

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

सद्योगपंथें घरि आणियेलें।
अंगेच मातें परब्रह्म केलें।
प्रचंड तो बोधरवि उदेला।
विसरुं कसा मी गुरुपादुकांला।।२।।

चराचरीं व्यापकता जयाची।
अखंड भेटी मजला तयाची।
परमपदीं संगम पूर्ण झाला।
विसरुं कसा मी गुरुपादुकांला।।३।।

जो सर्वदा गुप्त जनांत वागे।
प्रसन्न भक्ता निजबोध सांगे।
सद्भक्तिभावांकरितां भुकेला।
विसरुं कसा मी गुरुपादुकांला।। ४ ।।

अनंत माझे अपराध कोटी।
नाणी मनीं घालुनि सर्व पोटीं।
प्रबोध करितां श्रम फार झाला।
विसरुं कसा मी गुरुपादुकांला।।५।।

कांहीं मला सेवनही न झालें।
तथापि तेणें मज उद्धरीलें।
आता तरी अर्पिन प्राण त्याला।
विसरुं कसा मी गुरुपादुकांला।।६।।

माझा अहंभाव वसे शरीरीं।
तथापि तो सद्गुरु अंगिकारीं।
नाहीं मनीं अल्प विकार ज्याला।
विसरुं कसा मी गुरुपादुकांला।।७।।

आतां कसा हा उपकार फेडूं।
हा देह ओवाळुनि दूर सांडूं।
म्यां एकभावें प्रणिपात केला।
विसरुं कसा मी गुरुपादुकांला।।८।।

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

**जया वानितां वानितां वेदवाणी।**
**म्हणे 'नेति नेतीति' लाजे दुरुनी।**
**नव्हे अंत ना पार ज्याच्या रुपाला।**
**विसरुं कसा मी गुरुपादुकांला।।९।।**

**जो साधुचा अंकित जीव झाला।**
**त्याचा असे भार निरंजनाला।**
**नारायणाचा भ्रम दूर केला।**
**विसरुं कसा मी गुरुपादुकांला।।१०।।**

**।।इति गुरुपादुकाष्टक संपूर्ण।।**

आपला उद्धारकर्ता जो गुरू तो आपणांस प्राणप्रिय आहे, अशी भावना आदि शंकराचार्यांची. आपल्या शरीरी, देही वसणारा अहंकार जे स्वतःकडे मोठ्या मनाने स्वीकारतात आणि अल्पसाही विकार ज्यांना स्पर्श करू शकत नाही, त्या सद्‌गुरूंच्या पादुका आपण नाही विसरू शकत.

गुरुंच्या रुपाला तर अंतही नाही, पारही नाही. साधुचा अंकीत ज्यांचा जीव, साक्षात नारायणाचाही भ्रम दूर करणारे सद्‌गुरू महान आहेत, थोर आहेत. अशा गुरु पादुकांना आपण नाही विसरू शकत.

असा हा गुरुमहिमा आणि गुरूपादुका महिमा. गुरू तर धैर्यवान, धैर्यवंत, धैर्यमूर्ती. संदेहहर्ते आणि नवनीतासारखे मृदू. ते तर भवसरिता पारकर्ते. वैराग्य कीर्ती आणि वैराग्यमूर्ती! गुरू तर त्रिकालज्ञानी. आत्मसाक्षात्कारकर्ते, सुखसागर आणि आत्मा मालिक!

दीनानाथ, संतसोयरे अशा सद्‌गुरूंची थोरवी ही अशी अपार, असामान्य, असाधारण, महान आहे.

**- डॉ. सुनील शिंदे,**
'दत्त सुकृत', 'व्हेलेन्सिया रेसेडेन्सी' ,
बी विंग, फ्लॅट नं. १०४, पहिला मजला,
अगस्ती सहकारी साखर कारखाना रोड,
अकोले, जि. अहमदनगर
(मो. ९४२३०४५३४२/९०७५९९४३३२)

***

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.



## गुरू साक्षात परब्रह्म

**गुरुपौर्णिमेला सद्‌गुरूभेट होणे हे जीवाचे परमभाग्य असते. श्रीगुरू मुमुक्षू भक्तांकडून योग्य ती साधना करून घेतात. मनाची प्रपंचातील आसक्ती कमी करतात. मनुष्याच्या मनात परमात्मा ईश्वराचे सर्वव्यापी अस्तित्व याची जाणीव करून देतात. त्यामुळे भक्तास ईश्वरभक्तीची आवड व प्रेम निर्माण होते. भक्ताने अनन्य भावाने गुरुचरणी शरण जावे. गुरूंची मनोभावे नित्य ध्यानातून मानसपूजा करावी.**

**-बी. के. गायकवाड**

आषाढ मासातील गुरुपौर्णिमा महर्षी व्यास पौर्णिमा म्हणून ओळखली जाते. यावर्षी १० जुलै २०२५ रोजी गुरुपौर्णिमा सर्वत्र साजरी होत आहे. मानवाच्या जीवनात श्रीगुरूंचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. ८४ लक्ष योनींतून हा मनुष्यदेह मानवाला प्राप्त झाला आहे. या जन्मात आल्यावर आपले कल्याण करून मनुष्य देहाचे सार्थक करावे, असे संतजन आवर्जुन सांगतात आणि हे आत्मकल्याण केवळ श्रीगुरुच करू शकतात. त्यासाठी संतसंगती, संतसहवास अत्यंत महत्त्वाचा आहे.

लहानपणी माता-पिता हेच गुरू असतात. त्यांच्याकडून बालपणीचे संस्कार होतात. तद्‌नंतर विद्यार्थीदशेत विद्यादान देणारे शिक्षक गुरू होत. कार्यक्षेत्रातील अनुभवी मार्गदर्शकही व्यावसायिक गुरू होत. तथापि परमार्थात जीवाला आत्मकल्याणाचा मार्ग दर्शविणारे व आपल्या निजस्वरूपाची खरी ओळख जीवाला करून देणारे आध्यात्मिक गुरू हे सद्‌गुरू होत.

या गुरुपौर्णिमेच्या पर्वकाळांत आपल्या सद्‌गुरूंना अनन्यभावाने श्रद्धा-भक्तीयुक्त अंत:करणाने शरण जावे व गुरूसेवेत विनम्रपणे समर्पित व्हावे. महर्षी व्यास यांनी गणेशाच्या सहाय्याने परमात्म्याने सांगितलेले अपौरुषीय चार वेद, १८ पुराणे, उपनिषदे, महाभारत आणि महाभागवत कथा लिहिली. या अध्यात्मिक परमार्थिक ग्रंथ लिखाणातून सर्व मानवास आत्म कल्याणासाठी बहुमोल मार्गदर्शन केले आहे. विशेषतः परमात्मा श्रीकृष्णाने आपला परमभक्त अर्जुन यास निवेदन केलेली श्रीमद्‌भगवद्‌गीता ज्ञान-विज्ञानासह परिपूर्ण आहे. श्रीमद्‌भगवद्‌गीता मानवास जीवनदायीनी आहे.

आजवर झालेल्या अनेक जन्मांतून प्राप्त संस्कारांमधून मनुष्य आपण धारण केलेला देह म्हणजेच 'मी' या दृढ समजुतीने, त्या अनुषंगाने देह सुखाच्या प्राप्तीसाठी सतत कर्माचरण करतो. जीव सुखाच्या आशेने संसार प्रपंचात गुंततो. प्रकृती-माया-गुणांनीयुक्त कर्माच्या अधीन होऊन सुख-दुःख अनुभवत जीव बंधनात पडून जन्म-मरण चक्रात अडकून राहातो.

संत सांगतात, वास्तविक आपला जीव हाच आत्मा असून, तो सत्-चित्-आनंद स्वरूप आहे व आनंद प्राप्तीसाठी जीवनात जीवात्म्याची धडपड चालू असते. सर्व सुखाचे प्रयत्न देहाच्या अनुषंगाने होतात व त्यातून भौतिक-ऐहिक सुख मिळते. जीवाला शाश्वत सुख-समाधान मिळत नाही. संत सहवास, सत्संगातून गुरू भेटीनंतर देहबुद्धी कमी होऊन आत्मबुद्धीची वृद्धी होते. मोह-माया बंधनातून मुक्त व षड्विकारांचे निर्मूलन संत संगतीने सत्संगातून, श्री गुरूंच्या मार्गदर्शनाने होऊ लागते. जीवनातील अज्ञानरूपी अंधार दूर करून ज्ञानाचा प्रकाश देणारे श्रीगुरू परमात्म्याचा सगुण अवतार आहेत.

**सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.**

सद्गुरूभेट होणे हे जीवाचे परमभाग्य असते. श्रीगुरू मुमुक्षू भक्तांकडून योग्य ती साधना करून घेतात. मनाची प्रपंचातील आसक्ती कमी करतात. मनुष्याच्या मनात परमात्मा ईश्वराचे सर्वव्यापी अस्तित्व याची जाणीव करून देतात. त्यामुळे भक्तास ईश्वरभक्तीची आवड व प्रेम निर्माण होते. भक्ताने अनन्य भावाने गुरुचरणी शरण जावे. गुरूंची मनोभावे नित्य ध्यानातून मानसपूजा करावी.

**ध्यान मूलं गुरु मूर्ति।**

**पूजा मूलं गुरु पदम्।**

**मंत्रमूलं गुरु वाक्यं।**

**मोक्षमूलं गुरु कृपा।।**

श्रीगुरूंनी दिलेली साधना, नामस्मरण, ध्यानधारणा, भक्तीने-एकाग्र चित्ताने करावी. यामधून भक्ताचे मन शांत होते. मन-चित्ताची शुद्धी होते. अशा भक्ताकडून सात्विक कर्माचरण होते. ही कर्मे सत्कर्मे होऊन परोपकारी होतात. कर्तेपणाचा अहंकार न बाळगता ती ईश्वरचरणी समर्पित झाल्याने त्यापासून कर्मबंध राहात नाही. निष्काम कर्माचरण हे भक्ताला जीवन्मुक्त होण्यास सहाय्यभूत होते. वास्तविक हाच मोक्ष, हीच मोक्ष अवस्था असते.

श्री गुरुचरणी अनन्य भावे शरण गेलेल्या भक्ताची संसाररूपी सागरातील जीवन नौका पैलतिरी सुखरूप नेण्याचे कार्य श्रीगुरू करतात. भक्ती मात्र निष्ठेची असावी. श्रीगुरूभक्ती हीच ईश्वरभक्ती होय. श्रीगुरू परब्रह्मस्वरूप अवतार आहेत.

**गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु, गुरुर्देवो महेश्वरः।**

**गुरु साक्षात परब्रह्म, तस्मै श्री गुरुवे नमः।।**

**श्रीगुरुगीतेत म्हटले आहे :**

**गुरु कृपा प्रसादेन आत्मारामं निरीक्षेयता।**

**अनेन गुरू मार्गे स्वात्मज्ञान प्रवर्तते।।**

श्री गुरु शरणागत भक्ताचे रक्षण करतात. त्यास सायुज्य मुक्ती प्राप्त करून देतात. श्री गुरुभक्तीने भक्ताला दैवी गुणसंपदेचा लाभ होतो. श्रीगुरूभक्तीत सर्व काही मिळते. इहलोकी, तसेच परलोकी सौख्य लाभते. भक्ताचा आत्मोद्धार होतो. श्रीगुरूंचे महात्म्य मोठे आहे. आत्मतत्व व गुरुतत्व एक आहे.

श्रीगुरुचरित्रातील ग्रंथातून शिष्य दीपक आणि श्रीगुरूवेदधर्म आख्यानातून श्रीगुरुभक्ती व सेवा यांचे वर्णन आले आहे. श्रीगुरू महात्म्य अवर्णनीय आहे. वेदसुद्धा नेती नेती म्हणतात. श्रीगुरू हे त्रिमूर्ती अवतार (ब्रह्मा, विष्णू, महेश) आहेत. प्रत्यक्ष परमात्मा विष्णू दशावतार कार्यात श्रीराम यांनी वशिष्ठ ऋषींना गुरू केले होते व भगवंत श्रीकृष्णाने सांदिपनी ऋषींना गुरू करून त्यांच्याकडून सर्व विद्याभ्यास पूर्ण केला व ज्ञानसंपादन केले. त्याची आपल्या गुरुप्रती अत्यंत निष्ठा होती.

**श्री गुरु हरिहर विरंची जाण।**

**स्वरूपी तोची नारायण।**

**मन करून निर्वा। सेवा करावी भक्तीने।**

**- गुरुगीता**

महर्षी नारदांच्या आज्ञेने वाल्या कोळ्याने आपल्या पापक्षालनार्थ श्रीरामाच्या नामाचे अखंडित स्मरण केले व त्यांचा आत्मोद्धार होऊन ते महान वाल्मीकी ऋषी झाले. ज्यांनी पुढे संपूर्ण रामायणाची

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

रचना केली.

संत ज्ञानेश्वर यांनी आपले गुरू, वडील बंधू संत निवृत्तीनाथ यांच्या आज्ञेवरून श्रीमद्भगवद्गीतेचे प्राकृत मराठी भाषेतून ज्ञानेश्वरी लिहून लोककल्याण कार्य केले.

संत जगद्गुरु तुकाराम महाराज यांनी प्रपंचातून परमार्थाकडे येण्यासाठी सर्वसामान्य जनांस ईश्वरभक्तीची आवड निर्माण केली. तुकाराम गाथा, भजने, अभंगांद्वारे लोकांत ईश्वरभक्ती रुजवली. वारकरी संप्रदायातून लाखो लोकांची पंढरपूरक्षेत्री विठ्ठल माऊली भेटीची आषाढ-कार्तिक मासातील सुरू केलेल्या वारीला शेकडो वर्षांची परंपरा आहे. लाखो वारकरी आजही लाखोंच्या संख्येने मोठ्या भक्तिभावाने ही वारी करतात.

संत ज्ञानेश्वर माऊली, संत तुकाराम महाराज, समर्थ रामदास स्वामी अशा अनेक संत महात्म्यांनी लोककल्याणकारी कार्य केले आहे. या सर्व संतांचे भक्तिभावाने स्मरण करून गुरूपौर्णिमेस त्यांच्या चरणी विनम्र भावे नतमस्तक होऊ या.

आत्मा मालिक ध्यानपीठ, कोकमठाण येथे आत्मा मालिक ध्यान योग मिशनद्वारा प. पू. सद्गुरू माऊलींच्या सानिध्यांत सर्व संतमांदियाळीच्या उपस्थितीत आषाढ शुद्ध पौर्णिमा दि. ८ ते १० जुलैदरम्यान कोकमठाण येथे गुरुपौर्णिमा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवातील दैनंदिन कार्यक्रमांतर्गत पहाटे गुरूपादुका पूजन, होम हवन, भजन, आरती, योगा, संतांचे प्रवचन, भजन, हरिपाठ, कीर्तन सेवा आदी कार्यक्रम होणार आहेत. परब्रह्मस्वरूप सद्गुरूंच्या पावन सानिध्यात ध्यान-आत्मचिंतन होणार आहे. सद्गुरू माऊलींनी भक्तांना दिलेल्या अनुष्ठानाची पूर्तता, शुद्ध चौदसला नामदान होईल. भाविकांना सद्गुरूदर्शनाने आत्मिक आनंद प्राप्त होईल. अवतार लीला आत्मस्वरूपाची (नित्य-नियम साधना) या संत परमानंद महाराज लिखित ग्रंथाचे जिज्ञासू भक्ताने अवलोकन करावे. गुरुपौर्णिमेला गुरुदर्शन घेऊन कृतकृत्य होऊन, जीवनाचे सार्थक करून घ्यावे.

**||आत्मा मालिक ||**

**- बी. के. गायकवाड**

प्लॉट क्र.५, नव महाराष्ट्र को. ऑप.
हौसिंग सोसायटी, सातारा रोड,
अरण्येश्वर कॉर्नर, पुणे - ४११००९
मो. नं. ९४०३०२६१६४

***



## गुरुपूर्णिमा : सांस्कृतिक धरोहर

**भारतवर्ष की संस्कृति में गुरु-च्यवन जीवन-संयोजन का केन्द्र हैं। गुरु-पूज्य परंपरा न केवल विद्या-दत्तक का माध्यम बनी, अपितु आत्मानुभूति की गहनतम यात्रा का सार्थ स्तम्भ रही। सहस्त्राब्दियों से गुरु पूर्णिमा उस दिव्य संध्या को मनाती है, जब आकाश-तारों के बीच चन्द्रमा पूर्ण होकर अपनी शीतलता बिखेरता है, ठीक वैसे ही गुरु अपने शिष्यों के मन-मर्म में उजाला फैलाता है। गुरु पूर्णिमा भारतीय संस्कृति में अत्यंत महत्वपूर्ण और आध्यात्मिक पर्व है।**

**- नरेश एवं नीता यादव**

**भारुरे तिमिरान्धकारं ज्ञानदीपेन भास्वरम्।**
**गुरुमेव विद्धि वरदानं सर्वसाधनों प्रथमम्।।**

भारतवर्ष की संस्कृति में गुरु-च्यवन जीवन-संयोजन का केन्द्र हैं। गुरु-पूज्य परंपरा न केवल विद्या-दत्तक का माध्यम बनी, अपितु आत्मानुभूति की गहनतम यात्रा का सार्थ स्तम्भ रही। सहस्त्राब्दियों से गुरु पूर्णिमा उस दिव्य संध्या को मनाती है, जब आकाश-तारों के बीच चन्द्रमा पूर्ण होकर अपनी शीतलता बिखेरता है, ठीक वैसे ही गुरु अपने शिष्यों के मन-मर्म में उजाला फैलाता है। गुरु पूर्णिमा भारतीय संस्कृति में अत्यंत महत्वपूर्ण और आध्यात्मिक पर्व है। यह केवल एक उत्सव नहीं, बल्कि गुरु-शिष्य परंपरा का सम्मान और आदर प्रकट करने का विशेष अवसर है।

### गुरु-परंपरा का आध्यात्मिक स्वरूप

गुरु, संस्कृत में 'गु' (अन्धकार) और 'रु' (हरने वाला) - अर्थात् जो अज्ञान के अंधकार को हराता है। वह केवल विषयगत ज्ञान का वाचक नहीं, वरन् आत्मा-ज्ञान के रहस्य प्रदर्शक हैं। शिष्य जब उनके चरण-सरोजों में समर्पित होता है, तब आरंभ होता है अव्यक्त से व्यक्त की यात्रा।

**गुरु गोविंद दोऊ खड़े, काके लागूं पाय।**
**बलिहारी गुरु आपनो, गोविंद दियो बताए।।**

यह प्रसिद्ध दोहा यही उद्घाटित करता है कि गुरु और ईश्वर का स्थान एक-सा, पर गुरु पहले। आस्तिक पन्थ, वैदिक पन्थ, जैन-बौद्ध-शैव-वैष्णव-सर्वत्र गुरु-परंपरा ने आत्मिक उन्नयन को युग-युगांतर तक अक्षुण्ण रखा।

### अध्यात्म की गहराइयाँ

अध्यात्म की गहराई मात्र बौद्धिक विमर्श नहीं; यह उस अनुभव-क्षेत्र का विषय है, जहाँ शब्द भी सीमित पड़ जाते हैं। गुरु शिष्य संवाद यहाँ 'शून्य-स्थान' में गूंजता है, जहाँ दोनों चुप्पी में एक-

दूसरे को सुनते हैं।

**वाणी मौन में सिमट जाए, तब कथा शाश्वत होती है।**

**गुरु-मर्म का वह स्पर्श, मन की अनन्त ज्योति होती है।**

यह ज्योति है आत्मसोम ज्योति, जिसे आत्मज्ञान भी कहते हैं-जिसका प्रकाश शिष्यों के हृदय में जीवन्त चराचर को प्रकाशित कर देता है।

**एक अमूल्य गुरु-शिष्य कथा**

चलो सुनते हैं एक कथा महान् आचार्य शंकराचार्य एवं उनके गुरु गोविन्दभगवत्पाद की-बादरिया वन में हुई वह दिव्य मिलन-घटना। आदि शंकराचार्य बाल्यावस्था से ही अद्भुत स्मरणशक्ति, बुद्धिमत्ता एवं सरलता-से-साध्य व्यवहार के लिए विख्यात थे। तावत् ८ वर्ष के किए शिष्यविशेष, पर आत्मिक दृष्टि अभी तक आवरित।

उन्हे शंकर नाम से पुकारा जाता था, उन्होंने एक दिन मन ही मन चिन्तित होकर प्रश्न किया-गुरु की सन्निधि कैसे प्राप्त होगी? और वे निकल पड़े छींटे बादरियों में विद्यमान 'भव-कटाक्ष' को खोजने। वहाँ पहुँचे एकांत गुफा में, जहाँ एक ध्रुवज्योत्स्ना-सी शीतलता फैल रही थी-पाद पल्लव में विराजमान थे सद्गुरु गोविन्द भगवत्पाद।

सद्गुरु ने पूछा, कौन हो तुम, बालक?

शंकर ने प्रणाम कर कहा, मम नाम शंकरः, आध्यात्मिक ज्योति हेतु पन्थ खोजता।

सद्गुरु ने दांतों तले जीभ दबाकर मौन सूचक आह्वान किया-और बस! ये मौन, जितना गहन, उतना ही संवादवती था। दिन-रात मौन ध्यान के अङ्ग से जब शिष्य आत्मा-शून्य में विलीन हुआ, तब गुरु ने पुनः वाणी प्रेषित की:

शंकर, आदि-सत्य का भान हो गया तुझमें?

'अहम् ब्रह्मास्मि' का स्पर्श। इसी क्षण शंकर के हृदय-मण्डल में जब आत्मबोध जागा, तब उनके मन-मस्तिष्क का पूर्ण परिवर्तन हुआ। सद्गुरु के मौन शब्द ने ही उनको आत्मसाक्षात्कार से मिलाया।

**गुरु पूर्णिमा पर चिंतन एवं साधना**

गुरु पूर्णिमा केवल धार्मिक अनुष्ठान नहीं, बल्कि आत्मा का पुनर्जागरण-समारोह है। इस दिन:

१. शिष्य ऋणीभाव: शिष्य अपने गुरु के प्रति आभार व्यक्त करता है-वाणी, काव्य, प्रणाम, सेवा के द्वारा।

२. गुरु स्मरण: ध्येय न हो भूल-बिसर, गुरु की शिक्षाओं को जीवन में उतारें।

३. आध्यात्मिक अनुष्ठान: सत्संग, ध्यान, प्रवचन-इनसे आंतरिक दीप प्रज्वलित करें।

**शिव शंकर की प्रीति में, गुरुवर कृपा होती है।**

**हृदय जब उन्मीलित होता, तब साधना सिद्धि होती है।।**

सर्व देवांचा देव आत्मा! आत्मा हा प्रत्येकाच्या हृदयात निवास करतो व तो ध्यानाने प्राप्त होतो.

अंत में यही कहूँगा, गुरु पूर्णिमा हमें यह स्मरण कराती है कि सभी आध्यात्मिक अवधियों में गुरु का स्थान सर्वोपरि। जहाँ शब्द अक्षम हो जाते, वहाँ गुरु का मौन, उनकी निदान-शक्ति, उनके आंगिक स्पर्श से आत्मा को पोषण मिलता। हजारों वर्षों से भारत ने इसी दिव्य रस के तीर्थ को संजोया है। इस पूर्णिमा पर, आइए हम सब प्रण करें:

गुरु-वचन को हृदय में अंकित रखें

गुरु-स्नेह को जीवन-दर्शन मानें

स्वयं गुरुत्व के दायित्वों का पोषण करें-जब हम किसी के मार्गदर्शक बनें, तब उनमें भी वही दिव्यता संचारें, जो हमारे गुरुओं ने हममें प्रसारित की।

**गुरु पूर्णिमा की हार्दिक शुभकामनाएँ!**

**ॐ गुरुभ्यो -आत्मा मालिक**

**- नरेश एवं नीता यादव,**

आत्मा मालिक परिवार, इंदौर

***

।।आत्मा मालिक।।

आत्मा मालिक ध्यानपीठ, कोकमठाण

**आत्मा मालिक ध्यान योग मिशन** आयोजित

# गुरुपौर्णिमा महोत्सव




**दि. ८ जुलै - १० जुलै २०२५**

सर्व भाविकांना कळविण्यात येते की प्रतिवर्षी प्रमाणे याहीवर्षी परमपूज्य सदगुरू आत्मा मालिक माऊलींच्या पावन सानिध्यात कोकमठाण आश्रमात 'आत्मा मालिक गुरूपौर्णिमा महोत्सवाचे' आयोजन करण्यात आले आहे.

सदर महोत्सवात विश्वात्मक परिवारातील सर्व संत, महंत, साधक व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहे. तरी आपण या सत्संग सोहळयात सहभागी होऊन सदगुरूकृपेचा व संत दर्शनाचा लाभ घ्यावा ही विनंती.

| वेळ | दैनंदिन कार्यक्रम |
|---|---|
| पहाटे ०५ ते ०७ | ध्यान व काकड आरती |
| स. ०७ ते ०८ | नाश्ता |
| स. ०८ ते ०९ | भजन सेवा |
| स. ०९ ते १० | मौन ध्यान |
| स ११ ते दु.१२:३० | प्रवचन सेवा,भजन सेवा व मध्यान्ह आरती |
| दु. ०१ ते ०३ | महाप्रसाद |
| दु. ०३:३० ते ०५ | हरिपाठ |
| सायं. ०५ ते ०६ | मौन ध्यान |
| सायं. ०७ ते ०९ | सत्संग व आरती |
| रात्री ०९:०० | महाप्रसाद |

## दिव्य दर्शन व सत्संग सोहळा

**चौदस बुधवार दि. ९जुलै २०२५**

| वेळ | दैनंदिन कार्यक्रम |
|---|---|
| रात्री ०९ ते ११ | भजन सेवा/प्रवचन सेवा |
| रात्री ११ ते ०१ | भजन सेवा/प्रवचन सेवा |
| रात्री ०१ ते ०३ | मुख्य सत्संग ब्रम्हमुहूर्त महाआरती |

## अनुग्रह (नामदान सोहळा)

**चौदस**, बुधवार, दिनांक ९ जुलै २०२५ रात्री ०९:०० ते १०:०० या वेळेत होईल.

## कार्यक्रमाचे ठिकाण

**आत्मा मालिक ध्यान योग मिशन**

आत्मा मालिक ध्यानपीठ, कोकमठाण
शिर्डी कोपरगांव रोड, मु.पो. कोकमठाण, ता. कोपरगांव, जि. अहिल्यानगर
९५६१४८०४४८, ८३८००३९३०५, ८३८००३९४०५

सस्नेह निमंत्रण

* प्रेषक *

**संपादक, मासिक ॐ गुरुदेव**

**विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्ट, कोकमठाण,**

मु.पो.कोकमठाण (चैतन्यपुरी), शिर्डी-कोपरगांव रोड,
ता. कोपरगांव, जि. अहमदनगर (महाराष्ट्र)-४२३६०१